POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

● वर्ष-०५ ● अंक-३०७ ● मुंबई, मंगळवार, ०९ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

महाराष्ट्रात मान्सूनची गती धीमी, तूर्तास हलक्या सरी

१५ जूनपर्यंत पेरणी नको - सरकारचे आवाहन

मान्सून केरळातून आता तळकोकणात दाखल झाला असला तरीही राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये उन्हाचा तडाखा कमी होण्याचं नाव घेत नाहीय. अशा स्थितीत राज्य शासनानं दिला चिंतेत भर टाकणारा इशारा...



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,

वेळेआधी अंदमानात दाखल होणारा मान्सून तुलनेनं काहीसा उशिरानं केरळात दाखल झाला. ज्यानंतर कोकणासाठीचा प्रवास तुलनेनं वेगानं झाला. मात्र, त्यानंतर नैऋत्य मोसमी वाऱ्यांचा वेग पुन्हा मंदावल्याचं चित्र पाहायला मिळालं. दक्षिण कोकणातील काही भागांमध्ये पोहोचलेला मान्सून आता गोव्यातसुद्धा सक्रिय झाला आहे. पुढच्या पाच दिवसांमध्ये मोसमी पाऊस महाराष्ट्र, तेलंगणा, छत्तीसगढ आणि ईशान्य भारतात पुढे सरकण्याची चिन्हं आहेत. सध्याच्या घडीला कोकणातील देवगड आणि नजीकच्या क्षेत्रात पावसानं जोरदार हजेरी लावली असली तरीही मान्सूनच्या वाऱ्यांचा वेग वाढणं अपेक्षित आहे. त्यामुळं या वाऱ्यांसाठी आता अनुकूल स्थिती निर्माण होऊन पुढच्या 3 दिवसांत त्यांचा प्रवास कोणत्या टप्प्यावर पोहोचतो ही बाब अतिशय महत्त्वाची ठरणार आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार पुढील चार ते पाच दिवस कोकणात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पश्चिम महाराष्ट्रात सातारा आणि पुण्यासह राज्याच्या 25 जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. ज्यामध्ये सोमवारी आणि मंगळवारी विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची हजेरी असू शकते. ज्यादरम्यान वाऱ्याचा वेग ताशी 30- 40 किलोमीटर इतका असेल. ज्यामुळं किनारपट्टी भागातील नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मुंबई शहर आणि उपनगरांमध्येसुद्धा मान्सूनसाठी पूरक स्थिती निर्माण होत असली, तरीही रिमझिम पावसाचीच हजेरी शहरात या पावसाच्या प्रतीक्षेत आणखी भर टाकेल हे मात्र खरं.

पेरणीची घाई नको; फडणवीस सरकारनं स्पष्टच सांगितलं...

दक्षिण कोकणात मान्सून पोहोचला असला तरीही या वाऱ्यांना अपेक्षित वेग नसल्यानं 15 जूनपर्यंत राज्यातील पावसाचा जोर कमीच असेल, ज्यामुळं पूर्वमोसमी पावसाच्या सरींवर अवलंबून राहत शेतकऱ्यांनी पेरणीसाठी घाई करू नये असं आवाहन राज्य शासनाच्या वतीनं करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार कोकणात पोहोचलेला मान्सून 9 जूनपर्यंत सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीत पोहोचेल. 15 जूनपर्यंत मात्र मान्सूनची अपेक्षित हजेरी नसेल, तर राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये कमाल तापनात फारशी घट दिसून येणार नाही. त्यामुळं शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असं स्पष्ट आवाहन राज्य सरकारनं केलं आहे.

मेघगर्जनेसह पाऊस...

15 जूनपर्यंत विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रातील काही भागांत मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता वर्तवत हा पाऊस व्यापक क्षेत्रात पेरणीस पोषक ठरणार नाही असंही मुख्यमंत्री कार्यालयाकडून सांगण्यात आलं. ज्यामुळं घाईनं केलेली पेरणी शेतकऱ्यांच्या हाती नुकसान देईल, ही परिस्थिती टाळण्यासाठी शेतीच्या कामांमध्ये घाई करू नका असं सांगण्यात आलं. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये 18 जूननंतर पावसाचा जोर वाढेल. तर, कोकण किनारपट्टी आणि घाटमाथ्यावर जून अखेरपर्यंत सरासरीहून अधिक पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

यंदाच्या वर्षी मान्सूनच्या पर्वावर एल निनोचं सावट आहे. ज्यामुळं पावसाचं प्रमाण कमी असेल असं सातत्यानं यंत्रणा सूचिक करत आहेत. इतकंच नव्हे तर, मराठवाड्यासह इतर दुष्काळप्रवण भागात दुबार पेरणीचं संकट ओढावू नये यासाठी आतापासूनच सरकार काम करताना दिसत आहे.

मान्सूनची पुढील वाटचाल कशी असेल?

पुढील 3 ते 4 दिवसांत नैऋत्य मान्सूनच्या वाटचालीसाठी पोषक वातावरणनिर्मिती होताना दिसेल. ज्यामुळं वारे अरबी समुद्राच्या उर्वरित भागासह कर्नाटक, महाराष्ट्र, तेलंगणासह आंध्र प्रदेशातही पुढे सरकतील. बंगालचा उपसागर, तामिळनाडूचं उर्वरित क्षेत्र, वायव्येसह पश्चिम मध्य बंगालचा उपसागर, उप हिमालयीन पश्चिम बंगाल, सिक्कीम इथपर्यंत मान्सूनचे वारे मजल मारतील अशी अपेक्षा आहे.

विदर्भात उन्हाचा तडाखा....

जून महिन्याचा दुसरा आठवडा सुरू होऊनही विदर्भात मात्र उन्हाचा तडाखा कायम आहे. चंद्रपूर इथं ब्रह्मपुरीत रविवारी पारा 45.2 अंशांवर होता. एकिकडे मान्सून राज्यात दाखल झालाय खरा मात्र दुसरीकडे तापमानाचा इतका प्रचंड आकडा भलतीच चिंता वाढवून जात आहे. विदभार्तील अनेस शहरांमध्ये तापमान 43 अंश सेल्सिअसच्या घरात असून, आता नागरिक चातकाप्रमाणे पावसाची वाट बघत आहेत. पण, आणखी आठवडाभर तरी जोरदार पावसाची चिन्हं नसल्यानं ही चिंता आणखी गडद होताना दिसत आहे.

पुढील 24 तास अधिक काळजीचे

उष्ण- दमट हवामानाचा कहर, वादळी पाऊस- वाराही होणार हजर

■मुंबई । प्रतिनिधी,

भारतासह बहुतांश राज्यांमध्ये सध्या संमिश्र हवामान पाहायला मिळत असून, दक्षिणेकडील राज्यांमध्ये पावसाची जोरदार हजेरी पाहायला मिळत आहे, तर मध्य आणि उत्तर भारतामध्ये तापमानात काहीशी चढ- उतार पाहायला मिळत आहे. दक्षिण भारतात प्रामुख्यानं दक्षिण पश्चिम क्षेत्रामध्ये मान्सूनचा अधिक प्रभाव पाहायला मिळत आहे. या बदलांच्या पार्श्वभूमीवर 8 जूनसाठी केंद्रीय हवामानशास्त्र विभागानं देशभरात संमिश्र हवामानाचा इशारा दिला आहे. इथं महाराष्ट्रात दाखल झालेला मान्सून अद्यापही अपेक्षित प्रगती करत नसल्यानं पुढील 24 तासांमध्ये प्रामुख्यानं पश्चिम महाराष्ट्रासह कोकणातील काही जिल्ह्यांत पावसाच्या जोरदार सरी बरसतील. तर, उर्वरित राज्यात सायंकाळनंतर एकाएकी हवामान बदल पाहायला मिळतील.

कर्नाटकापासून आंध्र प्रदेशच्या किनारपट्टी क्षेत्रात पूर्व- पश्चिमेस कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. याचे परिणाम विदर्भासह मराठवाड्यातील हवामानावर पाहायला मिळत आहेत. पुढील 24 तासांत कोकणआतील प्रामुख्यानं रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा इथं पावसाच्या जोरदार सरींचा इशारा देत यंत्रणांनी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर, मुंबई, ठाणे, रायगड, नवी मुंबई इथं मात्र दमट हवामान अधिकच अडचणीचा ठरेल असं सांगण्यात येत आहे. ज्यामुळं पुढच्या 24 तासांत इथं ढगाळ वातावरण असूनही पाऊस नसल्यानं कोंडमारा होताना दिसेल.

राज्यात मान्सूनपूर्व पावसाची हजेरी

मागील 24 तासांत मनमाड, हिंगोली, सांगलीमध्ये दमदार मान्सून पूर्व पाऊस पडला आहे. सांगलीत जवळपास दीड ते दोन तासांहून अधिक काळ पडलेल्या पावसामुळे शहरातल्या रस्त्यावर पाणीच पाणी झालं होतं. या पावसामुळे शहरातले अनेक ठिकाणचा विद्युत पुरवठा ही खंडित झाला होता.

तिथं मराठवाड्याच्या बहुतांश भागांमध्ये मृग नक्षत्रात पाऊस पडला. गेल्या 24 तासांत मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर नांदेडमध्ये मुसळधार पावसाने हजेरी लावली. रविवारी नांदेड जिल्ह्यात सकाळपासून ढगाळ वातावरण होते. दुपारनंतर तिथं पावसाचा जोर वाढत गेला आणि संपूर्ण नांदेड शहर आणि आसपासच्या परिसरात पावसाने जोरदार बॅटिंग केली. या पावसामुळे उकाड्यापासून काहीसा दिलासासुद्धा मिळाला. पुढील 24 तासांमध्येसुद्धा आता पावसाची अशीच हजेरी राहिल्यास मराठवाड्याच्या तापमानात काही अंशांची घट अपेक्षित आहे.

मुंबईत पावसाच्या सरी?

मुंबईत उष्मा प्रचंड वाढलेला असतानाच या होरपळीपासून नागरिकांची लवकरच सुटका होणार आहे. हवामान विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार मुंबई शहर आणि उपनगरांत पुढील पाच दिवस ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल. तर, ठाणे, पालघरसुद्धा यास अपवाद ठरणार नाहीत असा अंदाज आहे.

दक्षिणेकडे मुसळधार!

आयएमडीच्या पूर्वानुमानानुसार कर्नाटकच्या किनारपट्टी भागांमध्ये 8, 9 आणि 10 जूनला मुसळधार ते अतीमुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. यादरम्यान डोंगराळ भागांमध्ये दरड कोसळण्यासह भूस्खलनाचाही धोका संभवतो अशी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. तर, केरळ आणि लक्षद्वीपच्या अनेक भागांमध्येसुद्धा पावसाची तीव्रता वाढेल, ज्यामुळं अरबी समुद्रासह बंगालच्या उपसागरात मासेमारीसाठी न जाण्याचा इशारा मासेमारांना देण्यात आला आहे.

मुंबईत पाणी संकट... टँकर सेवा बंद होण्याची शक्यता

■मुंबई । प्रतिनिधी,

मुंबईत पाण्याचं संकट गडद असताना पाणीटंचाईचा फटका बसण्याची दाट शक्यता आहे. केंद्रीय भूजल प्राधिकरण नियमांच्या अंमलबजावणीमुळे टँकर व्यवसाय संकटात सापडला आहे.. त्यावरून टँकर व्यावसायिकांमध्ये सरकारविरोधात संतापाची लाट उसळली असून त्यांच्या संपामुळे मुंबईतील पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर बनण्याची चिन्हे आहेत. केंद्र सरकारच्या नवीन नियमाच्या निषेधार्थ मुंबईतील वॉटर टँकरचालक आणि मालकांची संप पुकारला आहे. संपाचा इमारत आणि इतर बांधकाम प्रकल्पांसह झोपडपट्टया आणि व्यावसायिक आस्थापनांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. महापालिकेची रुग्णालये, अत्यावश्यक यंत्रणा तसेच अन्य विविध सेवांवर टँकरचालकांच्या संपाचा परिणाम होऊ शकतो

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या प्रमुख धरणांतील

नागरिकांना पाणीटंचाईचा फटका



पाणीसाठा केवळ 40 दिवस पुरेल इतकाच शिल्लक आहे. अशात मुंबईत वॉटर टँकर असोसिएशनने रविवारी मध्यरात्री 12 वाजल्यापासून टँकर सेवा बंद ठेवण्याची घोषणा केलीये. त्यामुळे मुंबई शहर आणि उपनगरांतील नागरिकांना पाणीटंचाईचा फटका बसण्यास सुरुवात झालीये.

टँकर सेवा बंद झाल्याने मुंबईतील पाणी संकट आणखी तीव्र होण्याची शक्यता. केंद्रीय भूजल प्राधिकरणाच्या नव्या नियमांविरोधात टँकर चालक संघटना आक्रमक झाल्या आहेत. जमिनीतील पाणी उपसा आणि परवानग्यांबाबतच्या नियमांमुळे अडचणी निर्माण झाल्याचा संघटनेने दावा केलाय. संघटनेकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालिका प्रशासनाकडे निवेदन देण्यात आलंय. मागण्यांवर सकारात्मक निर्णय होईपर्यंत एकही खाजगी टँकर रस्त्यावर उतरवणार नसल्याचा त्यांनी इशारा दिलाय...

मुंबईतील हजारो गृहनिर्माण सोसायट्या टँकर पाण्यावर अवलंबून आहेत. अनेक हॉटेल्स, व्यावसायिक संकुले आणि उद्योगांनाही याचा फटका बसण्याची शक्यता. पालिकेच्या 10 टक्के कपातीनंतर टँकर बंद झाल्यास परिस्थिती गंभीर होण्याची भीती वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे नागरिक, सोसायट्या आणि व्यावसायिक क्षेत्रात चिंतेचे वातावरण निर्माण झालं आहे. आता सरकार, पालिका प्रशासन आणि टँकर संघटना यांच्यात नेमकी काय चर्चा होणार याकडे संपूर्ण मुंबईकरांचे लक्ष लागलं आहे.

टँकर असोसिएशनच्या मूळ मागण्या

1. मुख्यमंत्री कार्यालयासोबत तातडीची बैठक आयोजित करावी.
2. CGWA (केंद्रीय भूजल प्राधिकरण) नियमांच्या अंमलबजावणीबाबत असोसिएशनची बाजू ऐकून घ्यावी.
3. स्थिती स्पष्ट होईपर्यंत इटउ आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सुरू असलेली कारवाई तात्पुरती स्थगित करावी.
4. टँकर चालक, विहीर मालक आणि पाणीपुरवठादारांवर जारी करण्यात आलेल्या नोटिसांबाबत पुनर्विचार करावा.
5. उऋहअ च्या काही नियमांमध्ये आणि प्रक्रियात्मक अटींमध्ये व्यवहार्य बदल करावेत, कारण त्या प्रत्यक्षात पूर्ण करणे कठीण असल्याचा त्यांचा दावा आहे.
6. विहीर मालकांच्या वीज जोडण्या तोडण्याची कारवाई थांबवावी.
7. खासगी पाणीपुरवठा व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी प्रशासनाने तातडीने तोडगा काढावा.
8. मागण्यांवर निर्णय होईपर्यंत टँकर व्यवसायावर होणारी प्रशासकीय कारवाई रोखावी.

गुटखा, पानमसाला विक्रेत्यांवर कारवाई


दोन कोटी किमतीचा गुटखा जप्त

■मुंबई । प्रतिनिधी,

अन्न आणि औषध प्रशासन विभागाने (एफडीए) 'गुटखामुक्त महाराष्ट्र' मोहीम हाती घेतली आहे. याअंतर्गत राज्यभरात करण्यात आलेल्या कारवाईत गुटखा, पानमसाला विक्रेत्यांना लक्ष्य करण्यात आले असून १९५ ठिकाणी टाकण्यात आलेल्या धाडीत १९२ जणांना अटक करण्यात आली आहे. राज्यभरातून सुमारे १ कोटी ९९ लाख १८ हजार ४७५ कोटींचा गुटखा, पानमसाल्याचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला आहे. अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी यासंदर्भात निर्देश दिल्यानंतर धाराशीव, धुळे, नांदेड, पुणे, मुंबईसह अन्य ठिकाणी धाडसत्र हाती घेत मोठ्या कारवाया केल्या. यामध्ये धाराशीव येथील परांडा येथे करण्यात आलेल्या कारवाईत १ कोटी दोन लाख ६७ हजारांचा साठा जप्त करण्यात आला. समृद्धी महामार्गावर सावंगी टोलनाका येथे घालण्यात आलेल्या







धाडीत ६० लाख ५० हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला. त्याचप्रमाणे महाराष्ट्र – तेलंगणा सीमा भाग, नांदेड, येथे करण्यात आलेल्या कारवाईत १७ लाख ५२ हजार रुपये किमतीचा माल आणि वाहने जप्त करण्यात आली. पिंपरी-चिंचवड येथील मोशी येथे करण्यात आलेल्या कारवाईत ६ लाख १९ हजारांचा माल जप्त करण्यात आला असून ६ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दादर प्लाजा टॉकीजजवळ बेस्टच्या बसचा भीषण अपघात

■मुंबई । प्रतिनिधी,

दादर प्लाझा टॉकीजजवळ बेस्ट बसचा भीषण अपघात झाल्याची माहिती मिळत आहे. चालकाचं स्टेअरिंगवरील नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाला. तीन ते चार गाड्यांना बेस्ट बसने धडक दिली. दोन जणांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. एका दुचाकीच बरच नुकसान झाल्याची सुद्धा माहिती आहे. या अपघातामुळे प्लाझा दादर परिसरात मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. बेस्ट बसमधील 4 प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी सायन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं आहे. बेस्ट बस धारावीकडून-दादरकडे येत होती. बसने सुरुवातीला नियंत्रण गमावल्यानं ट्रेलरला धडक दिली आणि अपघात झाला. बेस्ट बसचा ज्या ठिकाणी अपघात झाला, तो वर्दळीचा भाग आहे. दादरच्या प्लाझा टॉकीज आणि आसपासच्या परिसरात पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत गर्दी असते. भाजीवाले, व्यापारी, नोकरदार वर्ग यांच्या येण्या-जाण्याने हा भाग गजबजलेला असतो.



आतापर्यंत झालेले बेस्ट बसचे अपघात

- जानेवारी 2023 ते डिसेंबर 2025 या तीन वर्षांच्या कालावधीत इएरळ बसचे 958 अपघात झाले. त्यामध्ये 77 जणांचा मृत्यू आणि 217 जण जखमी झाले.
- यापैकी 85% पेक्षा जास्त अपघात सुमारे 815 अपघात हे वेट-लीज अर्थात भाडेतत्त्वावरील बसशी संबंधित होते.
- फक्त 2025 मध्ये 606 मोठे आणि किरकोळ अपघात नोंदवले गेले असून त्यापैकी 582 अपघात वेट-लीज बसांचे होते.
- 2024-25 आर्थिक वर्षात झालेल्या 12 प्राणघातक अपघातांपैकी 10 अपघात वेट-लीज इलेक्ट्रिक बसांचे होते.
- 2025-26 मध्ये बेस्ट बस अपघातांमधील 24 मृत्यूंपैकी 88% मृत्यू वेट-लीज बसशी संबंधित आहेत.

बेस्टची 463 क्रमांकाची बस प्लाझा सिनेमाजवळून जात असताना चालकाचं स्टेअरिंगवरील नियंत्रण सुटलं आणि हा भीषण अपघात झाला. बेस्ट बसने काही दुचाकींना सुद्धा धडकली. यात एक दुचाकी बसखाली आल्याचं बोललं जातय. पोलिसांकडून मृतांची ओळख पटवण्याचं काम सुरु आहे. बेस्ट बसने अनेक गाड्यांना सुद्धा धडक दिल्याची माहिती मिळत आहे. अपघातातील जखमींचा आकडा 4 पेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.

प्लाझा सिनेमाजवळ कोतवाल गार्डने आहे, तिथे हा अपघात झाला. सकाळी 9.30 च्या सुमारास हा अपघात झाला. इलेक्ट्रिकवर चालणारी ही बस असल्याची माहिती मिळत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जल व्यवस्थापन विभाग अंबरनाथ

निविदा सूचना प्रसिध्द करणेबाबत

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रोड नं.८२, अंबरनाथ (पूर्व) यांनी खालील कामांसाठी दोन लिफाफा प्रणालीतील सीलबंद निविदा फॉर्म आमंत्रित केले आहे. रिक्त निविदा फॉर्म कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.ज.व्य. विभाग, अंबरनाथ या कार्यालयात दिनांक १०/०६/२०२६ ते १५/०६/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत जारी केले जातील. या कामाची सीलबंद निविदा दि.१७/०६/२०२६ रोजी १७.०० वाजेपर्यंत किंवा आधी नमूद केलेल्या कोणत्याही कार्यालयात सादर करता येईल आणि शक्य असल्यास खालील नमूद तारखेला व वेळेवर म.जी.प्रा.च्या सक्षम प्राधिकरणाद्वारे उघडल्या जातील.

अ. क्र	निविदा सूचना क्रमांक	कामाचे नांव	निविदेची अंदाजित किंमत (रु.)	इसारा रक्कम (रु.)	सुरक्षा अनामत रक्कम (४%) (रु.)	काम पूर्ण करण्याचा कालावधी	निविदा कोऱ्या फॉर्मची किंमत रु.	म.जी.प्रा. कडे नोंदणीकृत कंत्राटदाराचा वर्ग	सिलबंद निविदा स्विकारण्याचा दिनांक व ठिकाण	सिलबंद निविदा उघडण्याचा दिनांक व ठिकाण
१	४४ सन २०२६-२७	M & R to Ambernath Water Works Repairs to 40 HP VT Pump Set No 2 Raw Water at Chikhloli, Ambernath	७०५१३.००	८००.००	एकूण रक्कम रु.२८२१/- (अ) प्रारंभिक रक्कम रु.१४११/-(ब) चालू देयकातून वसूल होणारी रक्कम रु.१४११/-	१ महिना	२३६.००	The Firm/Contractor should registered with M.J.P in Class-E (Mech./Elec.) or registered with PWD/ MIDC/CIDCO Or any other Government Dept. Equivalent class of MIP	दि. १७/०६/ २०२६ रोजी १७.०० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रोड नं.८२. अंबरनाथ (पूर्व)	दि. १८/०६/ २०२६ रोजी ११.०० वाजता. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, रोड नं.८२, अंबरनाथ (पूर्व)

टिप :

१) सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, एमजेपी विभाग, अंबरनाथच्या सूचना फलकावर पाहिली जाऊ शकते, विनंती केल्यास त्याची प्रत विनामूल्य मिळू शकते.

२) अर्जासह खालील कागदपत्रे जमा करणाऱ्या कंत्राटदारांना रिक्त निविदा फॉर्म देण्यात येईल,

अ) वैध नोंदणी प्रमाणपत्र.

ब) रिक्त निविदा फॉर्मच्या किंमतीची भरपाई

क) जीएसटीसाठी नोंदणी प्रमाणपत्र

३) रिक्त निविदा फॉर्म पोस्टद्वारे पाठविल्या जाणार नाहीत, कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतीही कारणे न देता नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकरणाने राखून ठेवला आहे

(सही/-)
कार्यकारी अभियंता,
म.जी.प्रा.ज.व्य.विभाग, अंबरनाथ.

क्र. जिमाका / ठाणे/ जाहि/ 2026-27/ 52



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

'स्क्रीन'वरुन रस्त्यांवर



प्रचलित व्यवस्थेतील दिरंगाई-भ्रष्टाचार, गैरप्रकारांमुळे विविध देशांमधील तरुणाई बेजार आहे. बेरोजगारीने त्यांच्या संतापात भरच पडत आहे. भारताच्या शेजारील नेपाळ, श्रीलंका आणि बांगलादेशातील सत्ताही याच ह्यजेन झीह्ण ने उलथवली.

प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधातला संताप आणि भवितव्याबाबतची निराशा यांमधून जन्मलेल्या 'कॉक्रोच जनता पार्टी'चे (सीजेपी) शनिवारचे दिल्लीतील पहिलेच आंदोलन लक्षवेधक ठरले. समाजमाध्यमांमध्ये ताकद दाखवल्यानंतर आंदोलनाची पुढील वाटचाल काय असणार, याबाबत देशभरात उत्सुकता होती. पोलिसांनी प्रथम केलेली अडवणूक आणि नंतर आंदोलनास दिलेली परवानगी, 'जंतर मंतर' परिसरातील कडेकोट बंदोबस्त आणि माध्यमकर्मी-निरीक्षकांची गर्दी यांमुळे हे आंदोलन देशभरात चचेर्चा विषय ठरले. आता हे आंदोलन राजकीय पक्षाचे रूप घेणार का; घेतल्यास तो पक्ष कोणत्या वाटेने जाईल, त्याचे राजकीय पदार्पण कोणाला फायदेशीर ठरेल, हा पक्ष लोकशाहीवादी आहे की अराजकवादी, अशा आशयाच्या चर्चा बहरात आहेत. मात्र, यापैकी कोणत्याही वादांमध्ये मागण्यांपासून लक्ष विचलित न होऊ देता आपल्या मुद्द्यांवर ठाम राहण्याचा स्पष्ट विचार या आंदोलनातून दिसला. या हजारो विद्यार्थ्यांनी मांडलेल्या आणि लाखोंच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांची उत्तरे या तथाकथित विश्लेषणांच्या गदारोळात हरवून जाऊ नयेत. भारतातही असे काही होईल का, अशा चर्चा सुरू झाल्या होत्या; मात्र, याच लोकशाहीने दिलेल्या अधिकारांनुसार आणि त्या चौकटीत समस्यांच्या विरोधात आवाज उठवला जाईल, असे दिल्लीतील आंदोलनातून स्पष्ट झाले आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी केलेल्या एका उल्लेखाचा धागा पकडून समाजमाध्यमांत सुरू झालेल्या या चळवळीला सव्वादोन कोटी समर्थक लाभले होते. त्यातून देशविरोधी कारवाया होण्याची भीती व्यक्त करून सरकारने त्यांच्या 'हँडल'वर बंदी आणली; मात्र त्यामुळे ही आग आणखी भडकली. त्या पार्श्वभूमीवर दिल्लीतील आंदोलनास परवानगी देऊन सरकारने धोरणात्मक शहाणपण दाखवले. हे सर्व तरुण आकांक्षा असलेल्या (ॲस्पिरेशन) वर्गाचे प्रतिनिधी आहेत; देशातील काँग्रेसचे सरकार हटवून मोदी सरकार आणण्यामागे याही वगार्चा हात आहे. प्रामुख्याने वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील (नीट) पेपरफुटी, 'सीबीएसई' परीक्षेतील गोंधळ आणि भरती प्रक्रियेमधील गैरप्रकार हे याच वर्गातल्या लाखो कुटुंबांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न आहेत. उच्चवर्गीय आणि सुशिक्षित वर्गातील सरकारच्या कारभाराविरुद्धचा संताप भडकण्यातून सरकारच्या राजकीय पायालाच धक्का बसू शकतो, याची जाणीव सरकारमधील निर्णयकर्त्यांना झाली असावी. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या आंदोलनाच्या राजकीय हाताळणीत तत्कालीन सरकारची फसगत झाली आणि त्यांना पायउतार व्हावे लागले. त्यामुळेच गाफिल न राहता युवकांना शांततामय मार्गाने आंदोलन करू द्यावे, असे सरकारने ठरवले असावे. कोणत्याही प्रश्नावर विरोधी आवाज उठवणाऱ्यांना 'आंदोलनजीवी', 'चीन-पाकिस्तानचे हस्तक' किंवा 'नक्षली' अशी टप्प्याटप्प्याने दूषणे देण्याचे प्रयत्न या वेळीही झालेच; मात्र, अशाच एका उल्लेखातून एवढी आग भडकली आहे, हे विसरून चालणार नाही. 'सीजेपी'च्या नेत्यांनीही 'हिंदू-मुस्लिमसारखे वाद उभे करून दिशाभूल करू नका,' असा इशारा दिलाच आहे. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा देईपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशारा पक्षाचे संस्थापक अभिजित दीपके यांनी दिल्याने आंदोलनात पुढे काय घडते, ते महत्त्वाचे. देशात राजकीय पक्ष स्थापन करणे आणि नागरिकांचा पाठिंबा व प्रत्यक्ष सत्ता मिळवणे हा प्रवास खडतर आहे. या आंदोलनामागे कोणाला परकीय हात दिसून येतो, तर कोणाला आम आदमी पक्षाची झलक दिसते; कोणी याला काँग्रेसला बाजूला टाकण्याठी 'भाजपचाच कावा' म्हणतात. या आंदोलनातून नवा राजकीय पक्ष जन्मास येणार का, याचे उत्तर आत्ताच देता येणार नाही. मात्र, सत्ताधारी वर्गाकडून प्रश्न सोडवण्याची उदासीनता आणि आत्ममग्नता व दुसरीकडे अनेक विरोधी पक्षांना लागलेला फुटीचा शाप यांमुळे तरुण वर्गात निराशा आहे, हे या आंदोलनातून स्पष्टपणे दिसले. नवी पिढी सुशिक्षित आणि महत्त्वाचे म्हणजे स्पष्ट विचारांची आहे आणि त्यांनी उपस्थित केलेले जिव्हाळ्याचे मुद्दे मोडीत काढून चालणार नाही, याची जाणीव सत्ताधाऱ्यांना या आंदोलनातून झाली असावी. 'जेन झी'मधील उद्रेकाची प्रचीती या निमित्ताने आली; त्याचे स्थायी ऊर्जेत रूपांतर होणार का, हे काळच ठरवील.

झुरळांच्या उपद्रवमूल्याची परीक्षा

कॉक्रोच जनता पार्टीचे पहिले आंदोलन शनिवारी दिल्लीत जंतरमंतरवर पार पडले. या आंदोलनाला मुख्य प्रवाहातील प्रसारमाध्यमांनी पुरेशी प्रसिद्धी दिली नाही. हा आरोप योग्यच आहे. प्रचलित माध्यमांसाठी जोपर्यंत एखादी घटना, घडामोडीचे प्रेक्षक किंवा वाचकांच्या अनुषंगाने दर्शनी आणि सनसनाटी ठरत नाही, तोपर्यंत ते त्यांची दखल घेत नाहीत. वृत्तवाहिन्यांसाठी टीआरपी हा विषय महत्वाचा असतो. जोपर्यंत हे गणित जमत नाही, तोपर्यंत ते त्या घटनेकडे दुर्लक्ष करतात. वेगाने बदलत्या जगात बातमीचे मूल्य ठरवण्याची परिमाणे आधुनिक काळात कमालीची बदलल्याने या बदलाचा स्वीकार करण्यावाचून पर्याय नाही, परंतु 'कॉक्रोच'ने समाजमाध्यमांचे गणित आणि त्याचा लोकव्यवहारातील उपयोग योग्य पद्धतीने समजून घेतला आहे. ही 'पार्टी' प्रचलित अर्थाने कोण्या राजकीय विचारवंताने स्थापन केलेली नाही, हेच या पाटीर्चे बलस्थान आहे. तशीही झुरळे उपद्रवीच मानली जातात, परंतु कोणत्याही वातावरणात, तापमानात स्वतःला टिकवून जिवंत राहण्याची आणि आपली संख्या वाढवण्याची त्यांची क्षमता इतर प्राणी किटकांच्या तुलनेत खचितच अधिक असते, हे वास्तव केवळ जीवशास्त्रापुरते मर्यादित नाही. ते इथल्या समाज आणि राजकीय शास्त्रालाही लागू पडते.

जगाचा इतिहास बदलण्यासाठी कारण ठरलेल्या दोन ऐतिहासिक चुका आजही संदर्भ उदाहरण म्हणून वापरल्या जातात, पहिली रोम जळत असताना निरोचं फिडल वाजवणं आणि फ्रान्सची राणी मेरी अँटोनेट हिने गरिबांच्या दुर्दशेबद्दल बोलताना केलेले असंवेदनशील वक्तव्य, फ्रान्सच्या जनतेला भाकरी मिळत नसेल तर त्यांनी केक खावा, या वाक्यातून राणीने 'नाही रे' गटाचा संताप ओढवून घेतला होता. रोम जळत असताना निरो खरंच वाद्य वाजवण्यात गुंग झाला होता का? खरंच असं झालं होतं का? आणि राणीनंही असं असंवेदनशील वक्तव्य खरंच केलं होतं का? या दोन्ही प्रश्नांची उत्तरे इतिहासाने वस्तुनिष्ठ पद्धतीने साधार दिलेली नाहीत. मात्र ही दोन्ही वक्तव्ये सत्तेच्या निर्ढावलेपणाची आणि असंवेदनशीलतेची उदाहरणे म्हणून जगमान्य झाली...

आपल्याकडे सर्वोच्च न्यायालयाच्या एका निकालाच्या सुनावणीवेळी सामान्य जनतेचा, विद्यार्थ्यांचा उल्लेख 'कॉक्रोच' असा खरंच केला गेला का? हा प्रश्न इथे अलहिदा ठरतो. संबंधितांना तसे म्हणायचे नसेलही कदाचित, परंतु त्यातून भारतीय विद्यार्थी आणि पर्यायाने जनता ही कमालीची किळसवाणी, दुर्लक्षित, उपद्रवी आणि सत्तेच्या चपलेखाली कायम चिरडली जाणारी झुरळं आहेत, असे सत्तेला वाटत असावे. सोशल मीडियावर लाखोंच्या संख्येने क्रॉक्रोचला मिळणाया समर्थकांचा दुजोरा सत्ता तसेच विरोधकांनाही अडचणीचा ठरू शकतो. यात सत्तेपेक्षा विरोधकांना या 'झुरळांची' मोठी अडचण ठरणार आहे. सत्तेच्या विरोधात सामान्य जनतेचा आवाज बनणे विरोधकांना शक्य झाले नाही, तर ही पोकळी ही झुरळे एकत्र येऊन भरून काढतील. तसे झाले तर राजकारणापेक्षा एका सामाजिक चळवळीची ही सुरुवात ठरू शकते. 'कॉक्रोच'नेही राजकारणाला विरोध करताना देशातील सामाजिक मुद्दे विचारात घेतले आहेत. प्रस्थापित राजकीय नेते त्याकडे दुर्लक्ष करत आहेत, पण फार काळ त्यांना त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

कॉक्रोच जनता पार्टी हा पारंपरिक अर्थाने निवडणूक लढवणारा राजकीय पक्ष नसल्याने तो अधिक अडचणीचा आहे. झुरळांनी ही चळवळ म्हणून घोषित केल्याने त्यांच्याशी थेट कुरघोडीचे, विकत घेण्याचे, ब्लॅकमेलिंगचे राजकारण खेळता येणार नाही. कॉक्रोचकडे सत्तेची गणिते नसल्याने त्यांच्यासाठी लढण्याचे सगळेच मैदान खुले आहे. त्यामुळेच सत्तेने या आंदोलनाची दखलच न घेण्याची खेळी खेळली आहे. 'दखल' घेऊन एखाद्या समूहशक्तीला मोठं होऊ द्यायचं नाही, अशी ही रणनीती आहे. त्यामुळेच सत्तेने अभिजीत दीपकेंना अटक केली नाही. माध्यमांनी या आंदोलनाची पुरेशी दखल घेतली नाही. सुरुवातीला या पक्षाला एक ह्यसोशल मीडिया मीम' किंवा 'ट्रेंड' म्हणून पाहिले जात होते. अवघ्या काही दिवसांत या पक्षाने इन्स्टाग्रामवर 2 कोटींहून अधिक फॉलोअर्सचा टप्पा पार केला. मात्र जंतरमंतरवर या आंदोलनात केवळ काही हजार तरुण-तरुणी जमले होते. यावरून या पार्टीच्या यशापयशाचे मूल्यमापन होणार नाही. या आंदोलनाचे बलस्थान समाजमाध्यमांवरील समर्थन आहे. प्रत्यक्ष मैदानावर कृती कार्यक्रम राबवणे आवश्यक आहे. समाज माध्यमांवरील सगळेच लोक मैदानात उतरत नाहीत. 'नीट'पेपरफुटीचा पहिलाच मोठा मुद्दा 'कॉक्रोच'च्या हाती लागला आहे. त्यातून थेट केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मागितला आहे. त्यामुळे सरकारने झुरळांना नगण्य समजून खरंच बेदखल केले आहे की, या झुरळांसमोर ते बॅंकफूटवर गेले आहे? याचे खरेखरे उत्तर पुढील काळात मिळेल.

नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे कॉक्रोच जनता पार्टीने बेरोजगारी आणि शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींविरोधात प्रत्यक्ष आंदोलन करून हे सिद्ध केले की, हा केवळ डिजिटल ट्रेंड नाही. त्यामुळे भविष्यात हा पक्ष रस्त्यावरील आंदोलनांच्या माध्यमातून तरुणांचा आवाज बनू शकतो. पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांच्या म्हणण्यानुसार, कॉक्रोच जनता पार्टी निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत पक्ष नाही. त्यांचा सध्या पारंपरिक राजकारणात उतरण्याचा किंवा निवडणूक लढवण्याचा कोणताही हेतू नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची चळवळ म्हणून सत्तेवर प्रभाव टाकणारा दबाव गट म्हणून 'कॉक्रोच' काम करेल. प्रत्यक्ष निवडणूक लढवण्यापेक्षा किंवा सत्तेत सहभागी होण्यापेक्षा हे जास्त परिणामकारक असल्याचे अभिजीत दीपके आणि त्यांच्या सहकारी कॉक्रोचेसनी ओळखले आहे.

सत्ता आणि स्वाभिमान या दोहोंमधून कॉक्रोचने तूर्तास तरी स्वाभिमानच निवडला आहे. त्यामुळे आजपर्यंतच्या परंपरागत सत्ताधार्यांना ही दुर्लक्षित झुरळे उपद्रवीच ठरणार आहेत. सध्या या झुरळांच्या उपद्रवमूल्याची तीव्रता किती आहे, हे सत्ताधारी, विरोधक इतकेच नव्हे तर लोकप्रिय प्रसारमाध्यमे दूरून पाहत आहेत. म्हणूनच ते त्यांच्यापासून अंतर राखून असावेत. परीक्षेतील घोटाळा लावून धरणाया कॉक्रोचच्या उपद्रवमूल्याची सध्या परीक्षा सुरू आहे. त्यात उत्तीर्ण होण्यासाठी त्यांना चिकाटीने काम करावे लागेल.



तथाकथित झुरळांचा उच्छाद!

'कॉकरोच जनता पार्टी'ने तिचे नवी देहलीतील जंतरमंतर येथे पहिले आंदोलन घेतले. 'जेन झी' (वर्ष १९९७ ते वर्ष २०१० या कालावधीत जन्मलेली पिढी) विद्यार्थ्यांचा मुख्य सहभाग असलेल्या या पक्षाकडे देशविरोधी शक्ती आणि विरोधी पक्ष हे अत्यंत आशाळभूत दृष्टीने पहात होते. जणू देशविरोधी काम करण्यासाठी एक आशेचा किरण त्यांना यांच्या रूपात दिसत आहे कि काय, एवढा आनंद झाला आहे. जे सोनम वांगचुक 'उद्या चीनचे सैन्य लडाखमध्ये आले, तर त्यांना आम्ही भारतात शिरण्याचा मार्ग दाखवू', असे म्हणतात; जे स्वतः लडाखमध्ये भारतविरोधी कारवायांमध्ये सहभागी आहेत, ते मोठ्या उत्साहाने या आंदोलनाचे नेते म्हणून आंदोलनस्थळी आले होते. साम्यवादी आघाडीच्या नेत्या ॲनी राजा, हिंदुविरोधी अभिनेते प्रकाश राज यांच्यासह काही राजकीय संघटनांचे नेते आंदोलनात सहभागी झाले होते, म्हणजे मूलतः 'जेन झी' वयोगट आणि सध्याचे तरुण यांचा सहभाग अपेक्षित असलेल्या या आंदोलनात राजकीय विचारसरणी असलेल्या नेत्यांच्या उपस्थितीवरून आंदोलनाचे राजकीयीकरण झाल्याचे लक्षात येते. याचाच अर्थ हे एकप्रकारचे राजकीय आंदोलनच होते.

'कॉकरोच जनता पार्टी'च्या स्थापनेपासून या पक्षाच्या सामाजिक माध्यमांच्या पानांना लाखो अनुयायी (फॉलोअर्स) मिळाले. त्यांच्या व्हिडिओंजना कोट्यवधी 'व्ह्यूज' (पाहिले गेले) मिळाले, ज्यामुळे अतिशय वेगाने 'कॉकरोच जनता पार्टी'चा 'जेन झी'मध्ये प्रसार झाला. सामाजिक माध्यमांवरील वाढत्या प्रतिसादामुळे 'आता कृतीसाठी रस्त्यावर उतरण्याची वेळ आहे, यातून जनमत मोठ्या प्रमाणात एकत्र करता येईल', या हेतूने या पक्षाने हे पहिले आंदोलन आयोजित केले होते. या आंदोलनाचे मुख्य सूत्र हे 'नीट' (राष्ट्रीय पात्रता परीक्षा) प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणी 'केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी लवकर त्यागपत्र दिले पाहिजे', हे होते. नैतिकदृष्ट्या ही मागणी न्याय्य आहे आणि धर्मेंद्र प्रधान यांनी तसे केलेही पाहिजे होते, असे राष्ट्रप्रेमींनाही वाटते. यातील मूळ सूत्र रहाते ते, म्हणजे एवढ्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत सरकारच्या अनेक विभागांचा सहभाग आहे; अनेक अधिकारी, कर्मचारी, स्थानिक स्तरावर अन्य यंत्रणा इत्यादींचा समावेश आहे, त्यांच्या चौकशीची मागणी झाली पाहिजे. धर्मेंद्र प्रधान त्यागपत्र देऊन मोकळे होतील; मात्र प्रशासकीय स्तरावरची भ्रष्ट यंत्रणा दुरुस्त कोण करणार? त्यासाठी कुणी काही करायला नको का? ज्या लातूर येथे या प्रकरणाचे महत्त्वाचे धागेदोरे, समाजात वलयांकित व्यक्तीमत्त्वे असलेले आरोपी म्हणून सापडले, तेथील कुणाच्या राजकीय पाठिंब्याने मोठे प्रकरण झाले, याचाही शोध घेतला पाहिजे. अशा विविध मागण्या या आंदोलनात दिसल्या नाहीत. आंदोलनकर्त्यांना मुळात विषय सोडवण्याची इच्छाशक्ती आहे का? हा प्रश्न आहे.

काही गोष्टींचा क्रम जोडल्यास हे विद्यार्थी आंदोलन वाटले, तरी यामध्ये 'आप'च्या अरविंद केजरीवाल यांचे मार्गदर्शन आणि पाठिंबा आहे का? याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे लपलेले हेतू काय आहेत? हेसुद्धा पडताळले पाहिजे. जे सध्या 'कॉकरोच'चे नेते म्हणून आंदोलनात सहभागी आहेत, त्यांची स्थिती काय होती? मुख्य समन्वयक अभिजित दीपके थेट अमेरिकेतून आंदोलनात सहभागी होण्यासाठी आले. ते येथील पोलीस ठाण्यात जाऊन रितसर अनुमती घेऊन आंदोलनस्थळी जाणार होते; मात्र ते थेट आंदोलनस्थळी गेल्याने कार्यकर्ते आणि पोलीस यांच्यात गदारोळ झाला. दुसरा एक समन्वयक विद्यार्थी आंदोलन करत असतांना दीपके मात्र झाडाखाली बसून चहा-कॉफी प्यायला बसले आहेत. याखेरीज त्यांना हवा घालण्यासाठी एका व्यक्तीची नियुक्ती केल्याचे जनतेने पाहिले. सामाजिक माध्यमांवर हा पक्ष म्हणून अनेक प्रकारे व्यक्त होता येत असले, तरी प्रत्यक्ष मैदानात आंदोलनाच्या ठिकाणी जी शिस्तबद्धता लागते, ती या पक्षाचे कार्यकर्ते आणि नेते यांच्यात दिसली नाही. काही विरोधी गट आंदोलनात शिरल्यामुळे त्यांनाही या पक्षाच्या कार्यकर्त्यांना आवरता न आल्याने तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. एकूणच काय, तर राजकीय रणनीती आखण्याचा पूर्वानुभव नसल्यामुळे आंदोलन परिणामकारक झाले नाही. उलट अनेक राजकीय पक्षांनी नंतर या आंदोलनाला पाठिंबा घोषित केल्यामुळे त्यांचेच हसे होईल, अशी परिस्थिती झाली. एकूणच काहीतरी मोठे करण्याच्या वा व्यवस्थेला आव्हान देण्याच्या नादात किंवा नेपाळसारखा पालट विद्यार्थी उठाव या पक्षाच्या माध्यमातून भारतातही करतील, असे ज्यांना वाटत होते, त्यांच्यासमोर बिकट स्थिती निर्माण झाली. त्यामुळे अनेक विद्यार्थी भलेही संघटित झाले; पण कशाला तरी विरोध म्हणून निर्माण झालेली ही वावटळ फार काळ टिकेल, असे वाटत नाही, असाही सूर तज्ज्ञांचा होता.

हा पक्ष विद्यार्थी शक्ती एकत्रित करण्याच्या नावाखाली देशविरोधी चळवळींचे बाहुले बनू शकतो आणि त्या माध्यमातून प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष देशविरोधी कारवाया होऊ शकतात. नुकतेच भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत हे लंडन येथील एका कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी गेल्यावर तेथे प्रश्न विचारतांना 'कॉकरोच'च्या सूत्रावरून त्यांचा अपमान करण्यात आला, म्हणजे देशाच्या सरन्यायाधिशांनी वेगळ्या संदर्भात दिलेल्या उदाहरणाचा विपर्यास करून त्या विरोधात आता एका पक्षाचा जन्म होणे आणि त्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आंदोलन होणे, हे सगळे काही पूर्वनियोजित असल्याचे वाटते. 'परा'चा कावळा करणे', अशी म्हण प्रचलित आहे. त्याचेच ही घटना उदाहरण आहे. जगामध्ये भारतात सर्वांत अधिक संख्येने तरुणवर्ग आहे, म्हणजेच भारत तरुणांचा देश आहे. या तरुणांना दिशा देण्यासाठी, तिला कृतीप्रवण करण्यासाठी, त्यांच्यासाठी कौशल्य विकासाच्या संधी निर्माण करण्यासाठी भारत सरकार प्रयत्नशील आहेच. या तरुणांचा देशविरोधी कारवायांसाठी उपयोग करून घेण्यास मात्र देशातील काही गट सक्रीय आहेत. भारतात लोकशाही असल्यामुळे प्रत्येकाला त्याचे मत मांडण्याचा अधिकार आहे, तरी त्याचा अतिरेक करू नये. साम्यवादी चळवळीतील शरजील इमाम, उमर खालिद, कन्हैया कुमार अशा विद्यार्थी नेत्यांनी तरुणांची माथी भडकवली होती. पुन्हा अशी शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे राष्ट्रप्रेमींनी संघटित राहून त्या त्या भागातील तरुणांना दिशा देणे आवश्यक आहे. राष्ट्रप्रेमींच्या एकजुटीची ही 'हिट' 'कॉकरोच'ला पळता भुई थोडी करू शकते, यात शंकाच नाही!

एसआयआर विरोधक वारंवार तोंडघशी

निवडणूक आयोगाची मतदारयाद्यांची साफसफाई (पुनरीक्षण) मोहीम वैधच आहे, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे विरोधी पक्ष पुन्हा एकदा तोंडावर पडले आहेत. केंद्र सरकार आणि संविधानाने निर्माण केलेल्या संस्थांच्या प्रत्येक निर्णयावर अविश्वास व्यक्त करून सामान्य जनतेच्या मनात त्याबद्दल संशय निर्माण करण्याचे प्रयत्न विरोधकांनी १२ वर्षांत अनेकदा केले. यापैकी एकाही प्रयत्नांना यश मिळालेले नाही. मतदारयादी पुनरीक्षण/साफसफाई/ दुरुस्ती (एसआयआर) म्हणजे काहीतरी गूढ असा समज निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधकांनी केला. निवडणूक आयोग दरवर्षी मतदारयादी अद्ययावत करतो. परंतु मतदारयादी पुनरीक्षण मोहिमेमध्ये अधिक खोलवर पडताळणी केली जाते. स्थलांतरित मतदार, मृत व्यक्ती, दुबार नावे, संशयित नागरिकत्व, चुकीची माहिती किंवा बनावट नोंदी यांची तपासणी केली जाते. अनेक वर्षांत झालेले मोठ्या प्रमाणावर शहरी स्थलांतर, अपूर्ण पडताळणीमुळे मतदारयाद्यांमध्ये गंभीर त्रुटी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे मुक्त वातावरणात निवडणुका होण्यासाठी एसआयआर आवश्यक आहे, असे निवडणूक आयोगाकडून सांगण्यात येत होते.

सर्वोच्च न्यायालयानेही हाच मुद्दा मान्य केला. निवडणूक आयोगाला संविधानाच्या कलम ३२४ अंतर्गत मतदारयादी दुरुस्तीचा अधिकार आहे, पुनरीक्षण प्रक्रिया मनमानी किंवा बेकायदेशीर नाही, मतदारयादी शुद्ध ठेवणे हे लोकशाहीच्या विश्वासार्हतेसाठी आवश्यक आहे. नागरिकत्वाबाबत प्राथमिक पडताळणी करण्याचा अधिकार आयोगाला आहे असे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातील काही महत्त्वाचे मुद्दे आहेत. यातून स्पष्ट होते की न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या अधिकारांवर शिक्कामोर्तब केले आहे. मतदारयादी पुनरीक्षणाला घेतले गेलेले सर्व आक्षेपही सर्वोच्च न्यायालयाने फेटाळले आहेत. या प्रक्रियेची व्यापकता पाहता त्यात कोणाचे अधिकार नाकारले गेले असे म्हणण्यास वाव नाही. एसआयआर प्रक्रियेत नोटीस देणे, नागरिकाची बाजू ऐकणे, हरकतींची नोंद घेणे, त्यावर कार्यवाही करणे आणि अपिलाच्या अधिकाराची तरतूद अशी आवश्यक खबरदारी घेतली गेली होती. मतदारयादीत नाव येण्यासाठी जी कागदपत्रे मागितली गेली होती त्यात कोणतीही मनमानी नव्हती, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदारयादी पुनरीक्षण मोहीम सुरू केल्यावर राहुल गांधी यांच्यासह सर्व प्रमुख विरोधकांनी त्याविरोधात काहूर उठवले. ईव्हीएमवर आरोप करून जनतेला भुलवण्यात अपयशी ठरल्यानंतर राहुल गांधींनी आपले अपयश झाकण्यासाठी मतदारयादी पुनरीक्षण मोहिमेचा वापर सुरू केला. त्या आधी मतदारयादीतील घोळ, मतदान आकडेवारी याबाबत चुकीची माहिती प्रसारित करून निवडणूक आयोगाबाबत संशय निर्माण करण्याचे अनेक प्रयत्न झाले. सीएसडीएस-लोकनीती या मतदान अंदाज वर्तविणाऱ्या संस्थेचे सहसंस्थापक संजय कुमार यांनी महाराष्ट्रातील देवळाली, रामटेक या विधानसभा मतदारसंघात लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत सुमारे ३५ टक्के मतदार कमी झाल्याचा दावा एका ट्विटद्वारे केला होता. या दोन्ही मतदारसंघात मतदार एवढ्या मोठ्या संख्येने कमी केले गेल्याने भाजप-महायुतीच्या उमेदवारांचा विजय झाला, असा आरोप काँग्रेसकडून केला गेला होता. या संजय कुमार यांनी १७ ऑगस्ट रोजी २०२५ रोजी टाइम्स ऑफ इंडियामध्ये भलामोठ्ठा लेख लिहून निवडणूक आयोग काँग्रेसच्या आरोपांना उत्तर देत नाही असे म्हणत निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले.

१९ ऑगस्ट २०२५ रोजी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीबाबत केलेले ट्विट मागे घेत असल्याचे जाहीर करीत या ट्विटबद्दल सपशेल माफी मागितली. निवडणूक आयोगाने मतदानाची आकडेवारी पुन्हा प्रसिद्ध करीत कायदेशीर कारवाईची भाषा केल्यावर संजय कुमारांनी आपले ट्विट मागे घेतले. रामटेक, देवळाली या विधानसभा मतदारसंघातील मतदारांच्या आकडेवारीबाबत आपले निष्कर्ष चुकले, अशी कबुली संजय कुमारांनी दिली. काँग्रेसला निवडणूक आयोगाच्या विरोधात प्रचार करण्यासाठी प्रसार माध्यमे व अन्य क्षेत्रातील नामवंतांचे कसे सहकार्य मिळते हे यातून दिसले. एकाच पत्त्यावर अनेक मतदार, मतदारांची चुकीची अपुरी नावे, एकाच मतदारांची अनेक ठिकाणी नावे अशा त्रुटी शोधून काढत राहुल गांधींनी निवडणूक आयोगावर भाजपसाठी मतचोरीचा आरोप केला होता. एकाच पत्त्यावर अनेक मतदार, मतदारांची चुकीची अपुरी नावे, एकाच मतदारांची अनेक ठिकाणी नावे या चुका आजच्या नाहीत. अशा चुका दुरुस्त करण्यासाठीच मतदारयाद्यांची साफसफाई सुरू करण्यात आली आहे. यातून भारतात घुसलेल्या आणि मतदारयादीत नावे असलेल्या बांगलादेशी नागरिकांची नावे वगळली जातील. या मोहिमेनंतर मतदारयादी अधिक अचूक होईल, मृत व्यक्ती, दुबार नावे आणि बनावट नोंदी कमी होतील, बोगस मतदान, बनावट ओळखपत्रे आणि अवैध मतदान रोखले जाईल. विरोधकांचा आक्षेप याच गोष्टीला आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाने विरोधकांचे सर्व आक्षेप फेटाळून लावीत मतदारयादी साफसफाई मोहमेला हिरवा कंदील दिला आहे. विरोधक पुन्हा तोंडघशी पडले आहेत. आपले अपयश झाकण्यासाठी विरोधक जोपर्यंत अशा कारणांचा शोध घेत राहतील तोपर्यंत त्यांना याच पद्धतीने तोंडघशी पडावे लागेल.

वारंवार तोंडघशी पडूनही विरोधक त्यापासून धडा घ्यायला तयार नाहीत. निवडणूक आयोग असो की अन्य घटनात्मक संस्था त्यांच्यावर शिंतोडे उडवून, विरोधक काहीच साध्य करू शकणार नाही. देशातील जनतेचा विश्वास हीच भाजपची खरी ताकद आहे.



भारतात घुसलेल्या आणि मतदारयादीत नावे असलेल्या बांगलादेशी नागरिकांची नावे मतदारयाद्यांच्या पुनरीक्षणानंतर वगळली जातील. या मोहिमेनंतर मतदारयादी अधिक अचूक होईल, बोगस मतदान, बनावट ओळखपत्रे आणि अवैध मतदान रोखले जाईल.

चप्पल आपल्याला संरक्षण देतात आणि ती एक फॅशन ॲक्सेसरीही आहे. अनेकदा चुकीचे फुटवेअर वापरले जातात, तेव्हा त्यांचे शरीरावरील परिणाम समजून घेतल्याने आणि योग्य बूट निवडल्याने तुमच्या समस्या सुटू शकतात.

फीट आणि योग्य : बूट हुशारीने निवडा!

हाय हिल्स :
हाय हिल्समुळे पायाच्या चवड्यांवर अतिरिक्त ताण येतो आणि त्यामुळे वेदना तसेच कॉलोसाइट्सचा त्रास होतो. त्यांच्यामुळे आपले घोटेही मुरगळू शकतात. हाय हिल्सचा दीर्घकाळ वापर केल्यामुळे पोटरीचे स्नायू लहान होऊ शकतात आणि पायात वेदना होतात. ते गुडघे, नितंब आणि मणक्यांवर अतिरिक्त ताण आणतात. त्यामुळे इतर समस्या उद्भवू शकतात. नियमित वापरासाठी २ इंचापेक्षा जास्त हिल्स वापरणे टाळा.

फूटवेअर आणि गुडघ्याचे ऑस्टिओआर्थरायटिस :
तुम्हाला गुडघ्याच्या वेदना किंवा आर्थरायटिसचा त्रास असल्यास कठीण किंवा टणक बूट आणि हाय हिल्स घालणे टाळा. संशोधनातून असे दिसून आले आहे की, कमी हिल्सचे लवचिक फूटवेअर (०.५ इंच) गुडघ्यांवरील ताण कमी करते.

फूटवेअर आणि मधुमेह :
दीर्घकाळ मधुमेह असल्यामुळे नसांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे पायात बधीरपणा येतो. त्याचा परिणाम म्हणून आपल्याला पायात कापलेले किंवा पुरळ आलेले जाणवत नाही आणि ते वेगाने गंभीर संसर्गात परावर्तित होऊ शकते. पायांची नियमित तपासणी करून लालसरपणा, पुरळ किंवा कापलेले असलेले तपासल्यास आणि खास मऊ फूटवेअरचा वापर केल्यास मधुमेहींमध्ये गंभीर गुंतागुंत टाळता येऊ शकते.



फीट

नवीन फूटवेअर खरेदी करताना तुमच्या पायांची लांबी आणि रुंदी मोजून घ्या. कारण, काळानुसार तुमच्या पायांचा आकार बदलू शकतो. तुम्ही पायाचा आकार संध्याकाळी मोजला पाहिजे, कारण दिवस संपताना पाय थोडासा सुजतो. तुमचे अंगठ्याचे बोट आणि बुटाचे टोक यांच्यामध्ये साधारण अर्धा इंच जागा असली पाहिजे. तुमच्या पायाचा सर्वात मोठा भाग बुटामध्ये घट्ट बसला किंवा चिमटला जायला नको. तुमचे बूट पायापेक्षा लहान असल्यास तुमच्या टाचेला त्रास होऊ शकतो. निमुळत्या फूटवेअरमुळे कॉर्न किंवा बुनियन्स होऊ शकतात. बूट खूप मोठे असल्यास घसरल्यामुळे पुरळ आणि वेदना होऊ शकतात.

योग्य फूटवेअरचा वापर

फील :
तुम्हाला चपलेत आरामदायी वाटले पाहिजे. आरामदायीपणा तपासण्यासाठी स्टोअरमध्ये नवीन चप्पल घालून चाला. तुमचा पाय जमिनीवर आपटतो तेव्हा त्याचा परिणाम कमी करण्यासाठी बुटाला पुरेशा प्रमाणात कुशन असले पाहिजे. लक्षात ठेवा, बूट तुमच्या पायानुसार असावेत, पाय बुटांप्रमाणे जुळवू नका.

फ्रेमवर्क :
चौरस किंवा गोल टो-बॉक्स असलेले बूट निवडा. टोकदार टो-बॉक्स असल्यास तुम्हाला कॉर्न, कॅलॉसाइटिस, बुनियन्स, टाचेतील नादुरुस्ती आणि पुरळ यांचा त्रास होऊ शकतो. बुटाची पुढची बाजू तुमच्या पायाच्या पुढच्या बाजूशी जुळती असावी. हील काऊंटर (बुटाची मागची बाजू) इतकी मजबूत असावी की, पाय मुरगळणार नाही आणि तुमच्या घोट्याला सपोर्ट मिळेल.

बूट बदलण्याची वेळ कधी :
तुमचे बूट खूप घासलेले असल्यास, तुमच्या घोट्याकडेही घासलेले असल्यास ते घर्षण आणि वापराचे परिणाम किंवा चिन्ह आहेत आणि ती तुमचे बूट बदलण्याची वेळ आहे.





मधाचे फेसपॅक

मध हे आपल्या आरोग्यासाठी औषधी आहे. मध हे आपल्या त्वचेवरही गुणकारी असल्याचे सिद्ध झाले आहे. बाजारात आलेले केमिकलयुक्त फेसपॅकमुळे आपल्या त्वचेवर विपरित परिणाम होत असतो. मधाचा फेसपॅक घरच्या घरी तयार करून आपली त्वचेचा सतेजपणा कायम ठेवता येऊ शकतो.

▮ मुलतानी मातीचे पावडर, गुलाबजल, मध (शहद) व संत्र्याचा रस प्रत्येक एक-एक चमचा घेऊन त्याची पेस्ट तयार करून रात्री झोपण्याआधी चेहऱ्यावर लावावी. १० ते १५ मिनिटांनी चेहरा स्वच्छ करावा.

▮ एक चमचा मधात एका अंड्याच्या बलक घालून चेहऱ्यावर लावावा. १० मिनिटानी चेहरा स्वच्छ करावा.

▮ पिकलेल्या केळीचा गर, कणीक व एक मोठा चमचा मध यांची पेस्ट चेहऱ्यावर लावावी. १० मिनिटांनंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ करावा.

क्रोकरी करा चकाचक



प्रत्येक महिलेला वाटते स्वयंपाकघरात काचेची उपकरणे असावीत. क्रोकरीचे आकर्षक प्रकार बाजारात उपलब्ध असल्यामुळे त्याची भुरळ पडल्याशिवाय राहात नाही. डायनिंग टेबलवर स्टायलिश क्रोकरी अधिक शोभून दिसतात. मात्र ही काचेची भांडी बरीच महाग असतात. शिवाय त्यांचा वापर अत्यंत काळजीपूर्वक करावा लागतो. खबरदारी घेतली नाही तर किती सामानाचे नुकसान होण्याची शक्यता असते. स्वच्छतेबाबतही क्रोकरीची विशेष काळजी घ्यावी लागते. काचेची चमक टिकून राहण्याचे काही वेगळे मार्ग अवलंबावे लागतात. आज यासंबंधी काही महत्त्वाच्या टिप्स जाणून घेऊ या. क्रोकरीवर डाग राहू नये, असे वाटत असेल तर ती वेळच्या वेळी स्वच्छ करायला हवी. फार काळ अस्वच्छ अवस्थेत ठेवल्यास डाग टिकून राहतात आणि स्वच्छ करणे कठीण होते. काचेची भांडी स्वच्छ करण्यासाठी गार पाण्याऐवजी गरम पाण्याचा वापर करावा. गरम पाण्याचा वापर केल्याने साबणाचा कमीत कमी वापर करून ही भांडी स्वच्छ करणे शक्य होते. गरम पाण्यामुळे भांडी स्वच्छ होतातच, शिवाय त्यावरील जीवजंतूंचाही नायनाट होतो. क्रोकरी स्वच्छ केल्यानंतर काही काळ व्हिनेगर मिसळलेल्या पाण्यात बुडवून ठेवावी. काही वेळाने बाहेर काढून न धुताच भांडी सुकवावी. यामुळे क्रोकरीची चमक टिकून राहते. काचेची भांडी धुतल्यानंतर त्यावर लिंबू रगडावे. लिंबामुळे न दिसणारे डागही निघून जातात आणि वेगळी चमक येते. लिंबू चोळण्यानंतर भांडी परत एकदा धुवून घेण्यास विसरू नये. क्रोकरीच्या आतल्या कडा स्वच्छ करण्यासाठी जुन्या ब्रशवर टूथपेस्ट घ्यावी आणि त्याने हलक्या हाताने स्वच्छता करावी. त्यानंतर कोमट पाण्याने भांडी धुवून घ्यावी.

सतत जांभया येत आहेत का?
मग त्यामागे असू शकतात ही कारणे

वारंवार जांभया येत असतील तर झोप अपुरी झाली असल्याचे हे लक्षण असल्याचे आपण मानतो. मात्र केवळ झोप अपुरी झाली असली तरच सतत जांभया येतात असे नाही. यामागे अन्य काही कारणेही असू शकतात. ही कारणे जाणून घेऊ या. सातत्याने येणाऱ्या जांभया हे मानसिक तणावाचे लक्षण असू शकते. मानसिक तणाव जास्त असेल, तर त्याचा परिणाम मेंदूच्या सक्रियतेवरही होत असतो. त्यामुळे मेंदूला सक्रिय ठेवण्यासाठी प्राणवायूचा पुरेसा पुरवठा होण्यासाठी वारंवार जांभया येऊ लागतात. मेंदूला प्राणवायूचा पुरवठा कमी होत असेल तर याचा परिणाम फुफ्फुसांच्या कार्यावरही होतो. यादरम्यान फुफ्फुसांमध्ये प्राणवायूची मात्रा कमी होऊन कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण वाढले, तर हा वायू कमी करून प्राणवायूची पातळी वाढवण्यासाठी देखील आपल्याला जांभई येते. जांभई आल्याने मेंदूमधील प्राणवायूचा पुरवठा झपाट्याने वाढतो आणि फुफ्फुसांमध्ये साठून राहिलेला कार्बन डाय ऑक्साईड बाहेर पडण्यास मदत होते.



पाठदुखी, कंबरदुखीने हैराण?
मग जमिनीवर झोपून पहा

आजकाल तरुण वर्गातही पाठदुखी, कंबरदुखी, मणक्याच्या वेदना, श्वास घेण्यास त्रास असे विकार वाढत चालले आहेत. सुखासीन जीवनशैली आणि व्यायामाचा अभाव ही कारणे त्यामागे आहेत तसेच रोजच्या आयुष्यात वाढलेले ताणतणाव ही त्याला हातभार लावत आहेत. आपल्या वापरत असलेल्या मऊ मुलायम गाद्या हे विकार अधिक वाढवतात असे निरीक्षण नोंदवले गेले आहे. मऊ गाद्या, उशा सुखद वाटल्या तरी पाठीची दुखणी, स्वास्थ्यासाठी त्या चांगल्या नाहीत असे तज्ज्ञ सांगतात. मणक्याचे विकार दूर ठेवायचे असतील तर जमिनीवर सतरंजी अथवा पातळ चटई टाकून त्यावर जमिनीला पाठ लावून झोपणे खूपच उपयुक्त ठरते.



अशा विश्रांतीचे अनेक फायदे होतात. पहिले म्हणजे जमिनीला पाठ लावून झोपण्याने पाठीचा कणा योग्य स्थितीत राहतो. उशी न घेता झोपले तर श्वास घेण्यास होत असलेला त्रास दूर होतो. एखाद्या रात्री झोप येत नसेल तर अशा प्रकारे जमिनीवर झोपून पहा, शांत झोप येते. खांदे, कुल्ले या ठिकाणी वेदना होत असतील तर जमिनीवर झोपण्याने त्या हळूहळू कमी होत जातात. पाठदुखीचा त्रास कमी होतो. गादीवर झोपल्याने शरीराचे तापमान वाढते, त्यामुळे शरीरात उष्णता वाढते. चटई अथवा सतरंजी घालून जमिनीवर झोपल्यास हा त्रास होत नाही, शिवाय रक्तप्रवाह सुरळीत राहतो आणि मेंदू शांत राहतो. स्नायूंना आराम मिळतो. रोज जमिनीवर झोपणे शक्य नसेल तर जेव्हा जेव्हा पाठदुखी, कंबरदुखी व वरील कोणते त्रास होतात तेव्हा काही दिवस तरी जमिनीवर झोपावे, असे सांगितले जाते.

कॉर्न फ्रिटर



▮ **साहित्य :** मक्याचे दाणे उकडून चेचून, उकडून किसलेला बटाटा, आवडत असल्यास किसलेले चीझ (चेडस चीझ असल्यास उत्तम), मिरपूड, ओरिगनो, बेसिल चुरडून, नसल्यास ड्राय हर्ब्स, किंचित साखर, मीठ, रेड चिली फ्लेक्स. यामध्ये आवडत असेल तर पालक किंवा गाजरही बारीक चिरून अथवा किसून घालता येईल.

▮ **कृती :** एका भांड्यात सर्व साहित्य एकत्र करावे. त्याचे चपटे गोळे करावे आणि तव्यावर छान तेलात परतून घ्यावेत. फुटत असतील तर थोडा मैदा, कॉर्नफ्लोअर, ब्रेड कुस्करून घालावा. यामुळे ते मिश्रण मिळून येईल. झाले आपले कॉर्न फ्रिटर तयार.

प्रसंगानुरूप मनुष्य वेगवेगळ्या प्रकारचे आणि आवश्यकतेनुसार तऱ्हेतऱ्हेचे वस्त्रप्रकार उपयोगात आणत असतो. त्यातलाच एक प्रकार आहे नाइटविअर. हा एक असा प्रकार आहे, जो आपले स्थान केवळ टिकवूनच नाही, तर दिवसेंदिवस अधिकाधिक 'स्टायलिश' होत आहे. ज्या नाइटविअरला आपण अधिक करून गाऊन या एकाच नावाने ओळखत, संबोधत असू तो आज कमालीच्या विविध अवतारांमध्ये दिसतो.

तऱ्हेतऱ्हेचे नाइटविअर



कोणे एकेकाळी ज्याची सुरुवात झाली असावी, केवळ सोय व आवश्यकता म्हणून. दिवसभराच्या हर तऱ्हेच्या कपड्यांचे ओझे वागवून जीव व देह दोन्हींना जरा आराम मिळावा, यासाठी सुटसुटीत असा हा झोपतानाचा पोशाख म्हणजेच नाइटविअर. हे खरे वाटत नाही ना? तेव्हा या अपेक्षांची पूर्ती करायला रोज वापरून मऊसूत झालेला, अक्षरशः अंगवळणी पडलेल्या एखाद दुसऱ्या रोजच्या ड्रेसने तेव्हा सुरुवात झाली असावी. हळूहळू याच्याकडेही लक्ष दिले जाऊ लागले असावे. त्यामुळेच याला एक विशिष्ट रूप आले. मग त्याची अनेक रूपे झाली. आज ही रूपे शमीस, नाइट ड्रेस कप्तान, गाऊन, मॅक्सी, रॅप सेट, टॉप-शॉर्ट्स सेट, बेबी डॉल अशी आहेत.

▮ शमीस हा साधारणतः सिंगल पीस असतो व लांबीला गुडघ्यांच्या थोडासा वर असतो. यातही आता टू-पीस किंवा रॅप असा आणखी एक प्रकार आला आहे. ▮ सेट म्हणजेच टी शर्ट-स्लीव्हलेस व पँट थ्री-फोर्थ असा ट्रेंड आहे. टीनएजर्ससाठी टॉप-शॉर्ट सेट विशेष करून आवडीचा होताना दिसतोय. ▮ रंग संगतीबद्दल ही आजकाल प्रत्येक जण 'चुझी' होताना दिसत आहे. नाइटविअरही त्याला अपवाद नाही. पांढरा, क्रीम, लायलॅक, पिंक, रेड, ब्लॅक हे झाले क्लासिक्स, तर नवीन रंगांमध्ये प्लम, परपल, हॉट पिंक, ॲक्वा म्हणजेच हॉट ब्ल्यू. पांढरा, गुलाबी, यलो, ब्राऊन, टरक्वॉइज या रंगांना पसंती आहे. ▮ इतकेच नव्हे तर त्याची डिझाइन, वापरलेले मटेरिअल या गोष्टींकडे ही विशेषत्वाने लक्ष दिले जाते. ब्रायडल आणि डिझायनर नाइटविअरला सुद्धा खूप मागणी आहे यातही पॅटर्नबद्दल बोलायचे झाले, तर पायघोळ, हॉल्टर नेक, योक पिस, शेपली म्हणजेच जास्त घेर नसलेला, फुल, थ्री-फोर्थ हे आहेतच. ▮ शिवाय प्रिंटबद्दल काय विचारायचे. प्लेन, टेक्सचर्ड, एम्ब्रॉयडरी, लाइट आणि ब्राइट प्रिंटेड, ॲबस्ट्रॅक्ट प्रिंटेड हे आहेचत, पण क्लासिक म्हणावे असे हलकेफुलके फ्लोरल व पोल्का डॉट्स आपले वर्चस्व टिकवून आहे. ▮ नाइटविअर म्हणजे दैनंदिन जीवनातील एक अविभाज्य घटक बनलेला आहे.





केस गळत आहे, टक्कल पडतंय आणि अनेक उपाय करूनही फायदा मिळत नाहीय, तर हे तेल आपल्यासाठी उत्तम पर्याय आहे. याने टक्कल पडलेल्या जागेवरही नवे केस येतील आणि केस दाट होतील. पाहू कसं तयार करायचं हे तेल..

या तेलाने उगवतात नवे केस

हे तेल तयार करण्यासाठी आपल्याला ५ वस्तूंची गरज आहे ज्या सहजपणे उपलब्ध असतात.

▮ लसणाच्या पाकळ्या : ६ ते ७ ▮ ताजा चिरलेला आवळा : २ ते t ▮ चिरलेला कांदा : १ लहान ▮ एरंडेल तेल : ३ चमचे ▮ नारळाचे तेल : ४ चमचे

या पाचही वस्तू मिसळून आपण तेल तयार करू शकता.



कृती - सर्वात आधी एका वाटीत नारळाचे तेल आणि एरंडेल तेल मिसळून घ्या. आता यात कापलेला लसूण, कांदा आणि आवळा टाका. हे मिश्रण मंद आचेवर ५ मिनिटे शिजवून घ्या. आता आचेवरून काढून १ तास हे मिश्रण असंच राहू घ्या. हे तेल नियमितपणे केसांना लावल्याने, केसांचे गळणे कमी होईल आणि गळलेल्या केसांमुळे डोक्यावरील त्वचा दिसायला लागली असेल तर तिथेही नवे केस येतील. याव्यतिरिक्त केसांमध्ये दाटपणा येईल. तर वेळ करू नका, तयार करा आणि या केसांना नवीन जीवन.



महिला असो किंवा पुरुष आपल्या लठ्ठपणामुळं हैराण असतात. या लठ्ठपणामागे अनेक कारणं असतात. आपलं खाणं-पिणं, राहणं यांचा सतत परिणाम आपल्या लठ्ठपणावर होतो. त्यामुळं आपल्या सौंदर्यावर तर परिणाम होतोच शिवाय आरोग्यही धोक्यात येतं.



लठ्ठपणा वाढण्याची सहा कारणे, हे उपाय करा!

दररोज काबोर्नेटेड ड्रिंक्स पिणं

जर आपण दररोज सोडा पित असाल तर सावधान, कारण त्याच्या सेवनानं लठ्ठपणा वाढू शकतो. संशोधनकर्त्यांनुसार दररोज सोडा प्यायल्यानं लठ्ठपणा जोमानं वाढतो. तर आठवड्यात एक वेळा सोडा प्यायल्यानं प्रकृतीवर जास्त परिणाम होत नाही. खूप जणांना वाटतं की डायट सोड्यात कमी कॅलरीज असतात. मात्र या कॅलरीजसुद्धा प्रकृतीसाठी हानीकारक असतात. त्यात साखरेचं प्रमाण अधिक असतं म्हणून जेवताना सोडा पिणं टाळावं. जर तुम्हाला जेवताना काही ड्रिंग प्यायचंच असेल तर फळांचा ज्यूस प्या.

जास्त फॅट्सयुक्त पदार्थ खाल्ल्यानं...

लठ्ठपणासाठी सर्वात जास्त जबाबदार खाण्या-पिण्याच्या सवयी असतात. जर तुम्ही बेसुमार मिष्ठान्न, तुप, फास्टफूड खात असेल तर लठ्ठपणाला सामोरं जावं लागेल. आपल्या आहारात जास्त फॅट्सयुक्त पदार्थ नसावे, याची काळजी तुम्हालाच घ्यायचीय. कारण त्यात कॅलरीची संख्या खूप कमी असते. त्यामुळं ते टाळल्यानं शरीर स्वस्थ आणि लठ्ठपणा विहरहित राहील. जेवणार ऑलिव्ह ऑर्लचा वापर करावा.

रात्री उशिरा जेवण करणं आणि लगेच झोपणं...

हे खरंय की जेव्हा आपण झोपता, तेव्हा नॅचरली आपल्या शरीरातून चरबी कमी होते. मात्र पोटभर जेवून झोपल्यानं असं घडू शकत नाही. अनेक जण रात्री खूप उशिरानं जेवतात, ज्यामुळं त्यांना पोटाशी संबंधित अनेक समस्यांना सामोरं जावं लागलं. सोबतच लठ्ठपणा ही समस्याही निर्माण होते. जर तुम्ही योग्य वेळी जेवणाची सवय लावाल, तर लठ्ठपणा कमी करण्यात मदत होईल. सोबतच रात्री जेवण कमी करावं आणि फळं खावीत. याशिवाय जेवल्यानंतर लगेच झोपू नये. कारण असं केल्यानं जेवण पचत नाही. आपल्या जेवणाऱ्या आणि झोपण्याच्या मध्ये कमीत कमी तीन तासांचं अंतर असावं.

जेवणासाठी मोठं ताट वापरणं...


जेव्हा आपण घरी किंवा बाहेर जेवता तेव्हा जेवताना आपल्या ताटाच्या आकाराकडे विशेष लक्ष द्यावं. एका सर्व्हेनुसार जे लोक जेवणासाठी मोठं ताट घेतात, त्यात भरपूर पदार्थ वाढून घेतात. त्यामुळं आपल्या शरीराच्या गरजेपेक्षा जास्त जेवण जेवल्या जातं. जर तुम्हाला लठ्ठपणा कमी करायचा असेल तर नेहमी छोट्या प्लेटमध्येच जेवा. यामुळे तुम्ही तुमची ओव्हर इटिंगची सवय बंद करू शकाल.

क्रोध आणि तणावात असताना अधिक जेवणं करणं...

आपण नेहमी बघितलं असेल की जेव्हा आपल्या खूप क्रोध येतो किंवा आपण तणावात असाल तर तुम्ही जास्त जेवू लागता. त्यावेळी जेवण चांगलं तर लागत नाही मात्र मनाला शांत करण्यासाठी आणि आणखी काही विचार करण्यासाठी तुम्ही खूप जेवता. त्यामुळं हळूहळू चरबी जमा होत जाते. क्रोध आणि तणाव असताना जास्त जेवण करणं टाळायचं असेल तर पाणी प्या. मित्रांसोबत गप्पा मारा आणि आराम करा. त्याशिवाय इतर कोणत्याही ॲक्टिव्हिटी आपण करू शकता. ज्यामुळं तुम्ही भावूक असताना एक्स्ट्रा कॅलरीज घेण्यापासून वाचू शकता.

व्हॉट्सॲपचे हे फीचर माहितेय का?
कोणत्याही भाषेत पाठवता येतो मेसेज, पाहा ट्रिक्स

आजकाल सगळेच नातेवाईकांशी किंवा मित्रांशी मेसेजवर बोलण्यासाठी व्हॉट्सॲपचा वापरतात. जर तुम्हीही व्हॉट्सॲप युजर असाल तर ही माहिती तुमच्यासाठी खूप महत्त्वाची आहे. मेटा-मालकीचे इन्स्टंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सॲप आपल्या युजर्सना बिल्ट-इन ट्रान्सलेशन फीचर ऑफर करत आहे. या फीचरच्या मदतीने तुम्ही तुमचा मेसेज समोरच्या व्यक्तीपर्यंत कोणत्याही भाषेत पोहोचवू शकता. म्हणजेच जर तुम्हाला हिंदी भाषा येत असेल. परंतु तुम्हाला इंग्रजी किंवा इतर कोणतीही भाषा जाणणाऱ्या तुमच्या मित्राशी किंवा ऑफिसमधील सहकाऱ्याशी बोलायचे असेल तर तुम्ही ते सहज करू शकता. भाषांतर फीचर वापरण्यासाठी पाहा ही स्टेप बाय स्टेप प्रोसेस.



भाषांतर फीचर वापरण्यासाठी तुम्हाला ही प्रोसेस फॉलो करावी लागेल. तुमचे व्हॉट्सॲप चॅट उघडा आणि एक नवीन मेसेज टाइप करा. आता हा टाईप केलेला मेसेज मेनू येतपर्यंत होल्ड करून ठेवा. आता मेनूमधील 'अधिक' पर्याय निवडा. आता भाषांतर पर्याय निवडा. आता तुमच्या समोर एक पॉप-अप विंडो उघडेल ज्यामध्ये तुम्हाला भाषांतरित मेसेज दिसेल. जर तुम्ही पाठवू इच्छित असलेल्या भाषेत मेसेजेसचे भाषांतर केले नसेल, तर युजर्स त्यांना ज्या भाषेत संदेश पाठवायचा आहे ते निवडू शकतात. तसेच व्हॉट्सॲपने एक नवीन फीचर रोल आउट करण्यास सुरुवात केली आहे. या नवीन फीचरच्या मदतीने युजर्स स्टेटस अपडेट्समध्ये व्हॉइस नोट्सही शेअर करू शकतील. व्हॉईस स्टेटस अपडेट फीचरची माहिती WA BetaInfo या प्लॅटफॉर्मद्वारे देण्यात आली आहे, जी व्हॉट्सॲप वर येणाऱ्या नवीन फीचर्सचा ट्रॅक ठेवते. WA BetaInfo ने ट्विट करून व्हॉट्सॲपमधील या नवीन फीचरचा स्क्रीनशॉटही शेअर केला आहे. WA BetaInfo नुसार, कंपनी सध्या काही बीटा युजर्ससाठी हे फीचर आणत आहे.

प्रदूषण करणाऱ्यांना पकडण्यासाठी सेन्सरची मदत

२० दिवसात यंत्रणा बसवण्याचे कानपूर आयआयटीला निर्देश

मुंबईतील हवेचे वाढते प्रदूषण नेमके कोठून व कशामुळे होत आहे हे शोधून काढण्यासाठी शहरभरात ७५ ठिकाणी सेन्सर्स बसवण्यात येणार आहेत. पुढील वीस दिवसामध्ये यासाठीची देखरेख यंत्रणा किंवा मॉनिटरींग नेटवर्क उभे करा असे निर्देश महापालिकेने कानपूर आयआयटीला दिले आहेत.



■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

मुंबईतील हवेचे वाढते प्रदूषण नेमके कोठून व कशामुळे होत आहे हे शोधून काढण्यासाठी शहरभरात ७५ ठिकाणी सेन्सर्स बसवण्यात येणार आहेत. पुढील वीस दिवसांमध्ये यासाठीची देखरेख यंत्रणा किंवा मॉनिटरींग नेटवर्क उभे करा असे निर्देश महापालिकेने कानपूर आयआयटीला दिले आहेत.

'मुंबई एअर नेटवर्क फॉर ॲडव्हान्स सायन्सेस' (प्रोजेक्ट मानस) नावाच्या या प्रकल्पांतर्गत शाळा, कॉलेज आदी ७५ ठिकाणी सेन्सर आधारित 'एअर क्वालिटी मॉनिटरिंग नेटवर्क' स्थापन केले जाणार आहे. ९ ते १० महिन्यांपूर्वी अशी यंत्रणा स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र त्याची अंमलबजावणी झाली आहे. आता जून अखेरपर्यंत यंत्रणा बसवण्याचे काम पूर्ण होईल, असे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

मुंबईत मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरु असल्यामुळे प्रदूषण पातळीत वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच वाढत्या वाहनांमुळेही प्रदूषणाचा स्तर उंचावत असल्याने धुळीचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे मुंबईत 'पीएम २.५' व 'पीएम १०' प्रतीच्या धुळीचे प्रमाण वाढले आहे. साधारण वातावरणात पश्चिमी वाऱ्यांमुळे शहरातील धूळ मिश्रीत धुके समुद्राकडे वाहत जाते. परंतु वातावरण बदलामुळे (प्रामुख्याने हिवाळ्यात) वाहत्या वाऱ्याचा प्रवाह कमी झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषित धुके मुंबईत आच्छादून राहते आणि असे प्रदूषण आरोग्यास घातक ठरण्याची शक्यता असते.

सध्या मुंबईतील विविध भागांतील हवेच्या गुणवत्तेची माहिती देणारी २८ वातावरणीय हवा गुणवत्ता देखरेख केंद्रे आहेत. मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेच्या प्रदूषण पातळीत भर घालणाऱ्या स्थानिक स्रोतांव्यतिरिक्त मुंबई महानगर प्रदेशमधील मुंबईच्या लगतच्या इतर भागांतून प्रदूषक वाहून नेणारे पश्चिमेकडील वारेसुद्धा मुंबईतील प्रदूषण पातळीत वाढ करण्यास हातभार लावतात.

प्रदूषणाच्या हॉटस्पॉट्सवर नजर

- मुंबईतील ७५ ठिकाणी सेन्सर आधारित एअर क्वालिटी मॉनिटरिंग नेटवर्कची स्थापना केली जाईल
- मुंबई महापालिका आणि मुंबईतील इतर शासकीय संस्थासाठी एकात्मिक नियंत्रण आणि कमांड सेंटरचा भाग म्हणून प्रगत रिल टाइम एअर क्वालिटी ॲनालिटीक डॅशबोर्ड विकसित केला जाणार आहे.
- सुधारित हवेच्या गुणवत्तेसाठी प्रभावी आणि जलद उपाययोजनांसाठी सेन्सर मॉनिटरींगद्वारे हॉटस्पॉट्स ओळखता येणार आहे.
- मुंबईतील बांधकाम धूळ, रस्त्यावरील धूळ आणि प्रदूषणाच्या इतर मोठ्या स्रोतांद्वारे होणारे हवेचे प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना केल्या जातील.

सावधान! वर्तमानपत्रात पॅक केलेले समोसे-भजी खाताय?

FSSAIकडून आरोग्याबाबत धोक्याचा इशारा

■मुंबई। प्रतिनिधी,

समोसे, भजी, वडापाव किंवा इतर गरम पदार्थ वर्तमानपत्रात गुंडाळून देण्याची पद्धत अजूनही अनेक ठिकाणी दिसून येते. मात्र, ही सवय आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते, असा इशारा भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने दिला आहे. वर्तमानपत्रातील शाई आणि रासायनिक घटक अन्नामध्ये मिसळून गंभीर आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात, असे प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे.

वर्तमानपत्रात अन्न पॅकिंगवर FSSAI ची कारवाई

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाच्या पश्चिम विभागाने सर्व खाद्य व्यवसायिकांना अन्नपदार्थ पॅक करणे, गुंडाळणे किंवा वाढण्यासाठी वर्तमानपत्रांचा वापर तात्काळ बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. अधिकृत सोशल मीडिया पोस्टमध्ये प्राधिकरणाने म्हटले आहे की, वर्तमानपत्रांमध्ये वापरली जाणारी छपाईची शाई आणि रासायनिक घटक अन्न दूषित करू शकतात आणि ग्राहकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण करू शकतात.



ग्राहकांनाही महत्त्वाचा सल्ला

ऋरअकने ग्राहकांनाही वर्तमानपत्रात पॅक किंवा वाढलेले अन्नपदार्थ खरेदी करण्याचे टाळावे, असा सल्ला दिला आहे. अन्न सुरक्षा नियमांचे पालन करणारे सुरक्षित आणि फूड-ग्रेड पॅकेजिंगच वापरणे आवश्यक असल्याचे प्राधिकरणाने स्पष्ट केले.

हॉटेल्स आणि स्ट्रीट फूड विक्रेत्यांना सूचना

हॉटेल्स, रस्त्यावरील खाद्यविक्रेते, फूड स्टॉल्स आणि इतर खाद्य व्यवसायांनी केवळ फूड-ग्रेड पॅकेजिंग साहित्याचाच वापर करावा, असे आवाहन *FSSAI* ने केले आहे. प्राधिकरणाने स्पष्ट केले की, वर्तमानपत्रे फूड-ग्रेड सामग्री नसल्याने त्यांचा अन्नाशी थेट संपर्क होणे धोकादायक आहे.

शाईतील रसायनांचा आरोग्यावर परिणाम

FSSAI च्या माहितीनुसार, वर्तमानपत्रांच्या शाईमध्ये शिसे (लेड) आणि इतर जड धातूंसारखे घातक पदार्थ असू शकतात. गरम, तेलकट किंवा ओलसर अन्नपदार्थांमध्ये हे रसायन सहज मिसळू शकतात. या विषारी घटकांमुळे दीर्घकालीन आरोग्य समस्या उद्भवू शकतात. तसेच, वर्तमानपत्रे अनेकदा अस्वच्छ परिस्थितीत हाताळली जात असल्याने अन्नजन्य आजारांचा धोकाही वाढतो.

मुंबईतील घटनेनंतर पुन्हा इशारा

मुंबईतील एका वडापाव विक्रेत्याकडून अन्नपदार्थ गुंडाळण्यासाठी वर्तमानपत्रांचा वापर केला जात असल्याचे समोर आल्यानंतर *FSSAI* आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी संयुक्त कारवाई केली होती. यानंतर ऋरअक ने पुन्हा एकदा विक्रेते आणि ग्राहकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

आरोग्य यंत्रणेचे तीनतेरा... अकोला आणि जालन्यातून विदारक दृष्य समोर

■मुंबई। प्रतिनिधी,

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली 'इमेज मेकओव्हर' ही मोहीम राबवली जात असून राज्यातील सरकारी रुग्णालयांचा कायापालट केला जात आहे. या मोहिमेच्या माध्यमातून गतिमान आणि दजेर्दार आरोग्य सेवांवर विशेष भर दिला जात आहे. असे असले रविवारी (07 जून) अकोला आणि जालन्यातून जी विदारक दृष्य समोर आली आहेत, ते पाहता ग्रामीण भागात आरोग्य यंत्रणेचे तीनतेरा वाजलेले पाहायला मिळत आहे.

पती खूप आजारी असल्याने पीडित महिला त्याला अकोला येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात (जीएमसी) घेऊन आली होती. मात्र पीडित महिलेला रुग्णालयात स्ट्रेचर मिळाले नाही. त्यामुळे आपल्या पतीला पाठीवर घेऊन पीडित महिलेला उपचारासाठी भटकत राहावे लागले. या महिलेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. असे असताना संबंधित व्हिडीओ



एआय जनरेट असल्याचा अजब दावा रुग्णालयातील अधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे. मात्र रुग्णालयात सुरक्षारक्षक व मदतीनीस असताना सुद्धा असे प्रकार घडत असल्याने जीएमसी रुग्णालयाबाबत नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. तर दुसरी घटना जालना येथील आहे.

जालन्याच्या परतूर शहरातील हिरालालनगर परिसरात राहणारा सुरेश डाकरे हा तरुण गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता होता. त्याचा मृतदेह आज शहरातील पाण्याच्या टाकीजवळ संशयास्पद अवस्थेत आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मात्र सुरेश डाकरेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी चक्क कचरा गोळा करणाऱ्या गाडीतून ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला. धक्कादायक म्हणजे नगरपालिकेकडे स्वतःची रुग्णवाहिका आणि शववाहिका उपलब्ध असतानाही मृतदेह कचरा गोळा करणाऱ्या गाडीतून नेल्याचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. कारण पंधरा दिवसांपूर्वीच स्थानिक आमदारांच्या हस्ते दोन नव्या रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले होते. असे असतानाही त्या रुग्णवाहिकेंचा वापर का करण्यात आला नाही? असा प्रश्न आता नागरिकांकडून विचारला जात आहे.

गंधर्व विवाहाच्या बहाण्याने उच्चशिक्षित तरुणींवर लैंगिक अत्याचार, इंजिनिअर साधूला अटक

■सातारा। प्रतिनिधी,

उत्तर प्रदेशातील मथुरा जिल्ह्यातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गोवर्धन पोलीस ठाण्याच्या पथकाने धर्माच्या नावाखाली सुशिक्षित तरुणींचे ब्रेनवॉश करून त्यांचे लैंगिक शोषण करणाऱ्या एका भोंदू बाबाला अटक केली आहे.

साधूचा वेश परिधान केलेल्या या आरोपीची ओळख अभिषेक मिश्रा उर्फ 'आदि कर्ता' अशी झाली असून तो मूळचा भुवनेश्वरचा रहिवासी आहे. विशेष म्हणजे आरोपी स्वतः एक मेकॅनिकल इंजिनिअर आहे. हा आरोपी गेल्या तीन वर्षांपासून गोवर्धन परिसरात वास्तव्य करून ऑनलाइन माध्यमातून सुशिक्षित तरुणींना आपल्या जाळ्यात ओढत होता. पोलिसांनी कारवाई करत या भोंदू बाबाच्या तावडीतून दोन तरुणी आणि एका तरुणाची सुटका केली आहे. तसेच त्याच्याकडून मोठ्या प्रमाणावर आक्षेपार्ह साहित्य जप्त करण्यात आले असून पोलीस पुढील कायदेशीर कारवाई करत आहेत.

12 हून अधिक मुली फसल्या

पोलीस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने आतापर्यंत डझनभरहून अधिक महिला आणि तरुणींना आपल्या जाळ्यात ओढले आहे. अटक केल्यानंतर पोलिसांनी जेव्हा या भोंदू बाबाचा मोबाईल फोन तपासला, तेव्हा त्यातून 25 ते 30 अश्लील आणि आक्षेपार्ह फोटो जप्त करण्यात आले. पोलीस या फोटोंच्या आणि आरोपीच्या डिजिटल फूटप्रिंट्सच्या आधारे या घृणास्पद रॅकेटमध्ये इतर काही लोकांचाही समावेश आहे का, याचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहेत. ग्रामीण पोलीस अधीक्षक सुरेश चंद्र रावत यांनी सांगितले की, ओडिशातील एका पीडित तरुणीने या नरकातून सुटका करून घेत हिंमत दाखवली आणि आरोपीविरुद्ध पोलीस ठाण्यात लेखी तक्रार नोंदवली, तेव्हा हे संपूर्ण प्रकरण उघडकीस आले.



गंधर्व विवाहाच्या नावाखाली

शारीरिक संबंध

अटक करण्यात आलेला आरोपी अभिषेक मिश्रा हा कोणताही अशिक्षित गुन्हेगार नसून तांत्रिकदृष्ट्या अत्यंत चतुर आहे. तो सोशल मीडिया आणि विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर भजन-कीर्तन मंडळी तयार करायचा. या माध्यमातून तो बी.टेक आणि एम.टेक झालेल्या उच्चशिक्षित तरुणींना लक्ष्य करत असे. तरुणींना करिअरचे उत्तम पॅकेज आणि आध्यात्मिक शांततेचे आमिष दाखवून तो गोवर्धन येथे बोलवून घ्यायचा. येथे आल्यानंतर तो या तरुणींचे मानसिकदृष्ट्या अशा प्रकारे ब्रेनवॉश करायचा की, त्या आपल्या घर-परिवाराला विसरून त्याच्या ग्रुपमध्ये सामील व्हायच्या. यानंतर हा भोंदू बाबा गंधर्व विवाहाच्या नावाखाली त्यांच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित करून त्यांचे शोषण करायचा.

आरोपीची रवानगी तुरुंगात

गोवर्धनचे उपअधीक्षक अनिल कुमार यांनी सांगितले की, पीडितेच्या तक्रारीची गंभीर दखल घेत पोलीस पथकाने तात्काळ सापळा रचून आरोपी अभिषेक मिश्राला अटक केली. छापामारीच्या कारवाई दरम्यान पोलिसांनी बाबाच्या बेकायदेशीर ताब्यातून दोन तरुणी आणि एका तरुणाची सुखरूप सुटका केली असून, त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधून त्यांना स्वाधीन केले आहे. आरोपीविरुद्ध विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याची रवानगी तुरुंगात करण्यात येत आहे.

कराडमध्ये शासकीय अभियंत्याची हत्या...

सुपारी देऊन रचला कट, जवळच्या नातेवाईकांना अटक



■सातारा। प्रतिनिधी,

सातारा जिल्ह्यातील कराड शहरात एका शासकीय अभियंत्याची हत्या करण्यात आल्याची माहिती समोर आली. या घटनेनंतर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली होती. या हत्येमागील सर्वांनाच हादरवून टाकणारं सत्य समोर आले आहे. सुरुवातीला अपघात वाटणाऱ्या या घटनेचा तपास करताना पोलिसांनी हा नियोजित खून असल्याचा दावा केला आहे. या प्रकरणात मृत अभियंत्याच्या जवळच्या नातेवाईकाला अटक करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार,लक्ष्मण श्रीरंग मंडले (वय ४५) हे ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथे जलसंधारण विभागात अभियंता म्हणून कार्यरत होते. सलग सुट्टी असल्याने ते ठाण्याहून कराडला घरी येत होते. शनिवारी पहाटे ते कराडमध्ये उतरून घराकडे जात असताना एका कारने त्यांना जोरदार धडक दिली. गंभीर जखमी झालेल्या मंडले यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्यांचा दुदैर्वी मृत्यू झाला.

घटनेनंतर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये कारने धडक दिल्यानंतर चालकाने वाहन पुन्हा मागे घेऊन मंडले यांच्यावर आणखी वारंवार गाडी चालवल्याचे दिसून आले. त्यामुळे हा अपघात नसून घातपात असल्याचे स्पष्ट झाले.

पोलिसांच्या हाती धक्कादायक माहिती

तपासादरम्यान पोलिसांना आणखी धक्कादायक माहिती मिळाली. मंडले यांच्या पत्नी सुरेखा मंडले आणि तिचा भाऊ संग्राम चव्हाण यांनी काही दिवसांपूर्वीच हत्येचा कट रचल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. प्राथमिक तपासानुसार, या गुन्ह्यासाठी काही व्यक्तींना पैशांचे आमिष दाखवून काम सोपवण्यात आले होते.

घटनेच्या दिवशी मंडले यांनी कराडमध्ये पोहोचल्यानंतर पत्नीला फोन करून आपल्याला घेण्यासाठी येण्यास सांगितले होते. याच माहितीच्या आधारे आरोपींना त्यांच्या हालचालींची माहिती मिळाल्याचे तपासात समोर आले आहे.


या प्रकरणात पोलिसांनी मुख्य सूत्रधार पत्नी सुरेखा मंडले आणि मेहुणा संग्राम चव्हाण यांना अटक केले. हल्ले करणारे दोन जण फरार झाल्याची माहिती आहे. हल्ला करणाऱ्या अन्य दोघांचा शोध सुरू आहे. त्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत. प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून पोलिसांकडून विविध पुरावे गोळा केले जात आहेत.

ऑफिसमध्येच मर्डर, सहकाऱ्याने क्रूरपणे संपवलं... निष्पाप तरुणीसोबत काय घडलं?

■मुंबई। प्रतिनिधी,

एका महिलेची तिच्याच एक्स बॉयफ्रेंडने कार्यालयात घुसून चाकूने निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. एका खासगी पॅकर्स अँड मूवर्स कंपनीच्या कार्यालयात ही भीषण घटना घडली. डिंपल असे मृत महिलेचे नाव असून ती याच कंपनीत कार्यरत होती. या घटनेने संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली असून महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीरपणे समोर आला आहे.

गुरुवारी सायंकाळी ऑफिसमध्ये काम सुरू असताना हरविंदर तिथे पोहोचला आणि त्यांच्यात वाद सुरू झाला. काही वेळातच या वादाचे रूपांतर हिंसक घटनेत झाले. सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेल्या दृश्यांनुसार, आरोपीने आपल्यासोबत आणलेल्या चाकूने डिंपलवर ताबडतोब अनेक वार केले. कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी हा प्रकार पाहिल्यानंतर तिथे



एकच आरडाओरडा आणि घबराट पसरली. डिंपलवर प्राणघातक हल्ला केल्यानंतर आरोपी हरविंदरने स्वतःवरही त्याच चाकूने वार करून आपली जीवनयात्रा संपवण्याचा प्रयत्न केला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि सहकाऱ्यांनी त्वरित पोलीस व रुग्णवाहिकेला पाचारण केले. गंभीर जखमी अवस्थेत दोघांनाही रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु उपचार सुरू असताना डॉक्टरांनी डिंपलला मृत घोषित केले. आरोपी हरविंदरची प्रकृती अजूनही नाजूक असल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिसांनी कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून ते तपासासाठी महत्त्वाचा पुरावा मानले जात आहे. प्राथमिक तपासानुसार, हे प्रकरण जुन्या प्रेमसंबंधातून, ब्रेकअपच्या रागातून आणि एकतर्फी दबावातून घडल्याचे दिसून येत असून पोलीस अधिक तपास करत आहेत. पंजाबच्या मोहाली शहरातील सेक्टर-66 जवळ असलेल्या ऑफिसमध्ये ही घटना घडली. डिंपली ही मूळची पटियाला येथील रहिवासी होती.

ब्रेकअप झाल्यानंतर पॅचअपसाठी करत होता प्रयत्न

या प्रकरणात आरोपीचे नाव हरविंदर मान उर्फ हॅरी असे असून, तो डिंपलचा एक्स बॉयफ्रेंड आणि सहकारी देखील होता. डिंपल आणि हरविंदर गेल्या तीन वर्षांपासून एकाच कार्यालयात काम करत होते आणि पूर्वी ते एकमेकांच्या रिलेशनशिपमध्ये होते. मात्र, सुमारे सहा महिन्यांपूर्वी त्यांच्यातील हे नाते संपुष्टात आले होते. ब्रेकअप झाल्यानंतर डिंपलने हरविंदरपासून पूर्णपणे दुरावा ठेवला होता, परंतु हरविंदर मात्र सतत डिंपलवर पुन्हा रिलेशनशिपमध्ये येण्यासाठी दबाव टाकत होता आणि तिला मनवण्यासाठी प्रयत्न करत होता.

एक्स बॉयफ्रेंड भेटला अन्... वकील महिलेने 6 वर्षीय लेकीला संपवलं

मृत्यूच्या वेगवेगळ्या कारणांमुळे संशय

24 मार्च रोजी झालेल्या चिमुरडीच्या अचानक मृत्यूबाबत विचारले असता, प्रियांकाने कुटुंबीयांना वेगवेगळ्या आणि संशयास्पद कहाण्या सांगितल्या.
एका प्रसंगी तिने मुलीला बियार्णी खायला घातल्याचे सांगितले, तर दुस ्या वेळी तिने मुलीला आईस्क्रीम देऊन वातानुकूलित (अउ) कारमध्ये झोपायला ठेवल्याचा दावा केला. नंतर, दुस ्या दिवशी सकाळी घरी परतल्यावर मुलगी मृत अवस्थेत आढळल्याचे तिने सांगितले. प्रियांकाच्या या बदलत्या विधानांमुळे कुटुंबीयांचा संशय बळावला.

■मुंबई। प्रतिनिधी,

एका आईने आपल्या पाच वर्षाच्या चिमुरड्या मुलीची हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. धक्कादायक म्हणजे आपल्या प्रियकरासोबत मिळून तिने ही हत्या केली. तीन महिन्यांपूर्वी झालेल्या या हत्येचा उलगडा मृत मुलीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीनंतर झाला. वेन्नीला असं चिमुरडीचं नाव आहे. 24 मार्च रोजी तिचा मृत्यू झाला होता. तिचे वडील प्रवीण यांनी पोलिसांत धाव घेत आपली पत्नी प्रियांका आणि तिचा कथित प्रियकर मोहन यांच्यावर मुलीच्या हत्येचा संशय व्यक्त केला. कर्नाटकची राजधानी बेंगलोर येथील ही घटना आहे.



जुन्या मित्रासोबत लिव्ह-इनमध्ये

मिळालेल्या माहितीनुसार, प्रवीण आणि प्रियांका यांचा 2007 मध्ये विवाह झाला होता. या दांपत्याला 17 आणि 5 वर्षांच्या दोन मुली आहेत. प्रियांका वकील आहे. प्रियांकाची काही वर्षांपूर्वी तिचा कॉलेजमधील प्रियकर मोहन याच्याशी पुन्हा भेट झाली आणि त्यांच्यात जवळीक वाढली. त्यानंतर ते एकत्र राहू लागले होते. या प्रेमसंबंधांमुळे पती-पत्नीत वाद निर्माण झाले होते आणि प्रियांकाने प्रवीण यांच्याकडे घटस्फोटाची मागणीही केली होती. मोहनसोबत लिव्ह-इनमध्ये राहू लागल्यानंतर प्रियांका आपल्या लहान मुलीला सोबत घेऊन जात असे.

प्रियकर अटकेत, प्रियांका फरार

दरम्यान, वडील प्रवीण यांनी मुलीचा शवविच्छेदन अहवाल परदेशात डॉक्टर असलेल्या आपल्या एका नातेवाईकाला दाखवला. या अहवालाचे बारकाईने निरीक्षण केल्यानंतर, मुलीला मारहाण करून तिचा गळा आवळून खून करण्यात आल्याचा संशय बळावला. यानंतर प्रवीण यांनी पोलिसांत अधिकृत तक्रार दाखल केली. पोलिसांनी या प्रकरणी संशयित आरोपी मोहन याला अटक केली असून, मुख्य आरोपी प्रियांका सध्या फरार असून पोलीस तिचा शोध घेत आहेत. या प्रकरणाचा फॉरेन्सिक लॅबच्या अहवालाची प्रतीक्षा असून पुढील तपास सुरू आहे.

आईचं वय 45 अन् प्रियकराचं 23, अलपवयीन मुलीला कळताच...

■मुंबई। प्रतिनिधी,

आई आणि मुलीच्या नात्याला काळिमा फासणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. आईच्या अनैतिक प्रेमसंबंधांची किंमत तिच्या 15 वर्षांच्या निष्पाप मुलीला चुकवावी लागली. मृत मुलीच्या आईच्या प्रेमात आंधळ्या झालेल्या 23 वर्षीय प्रियकराने मुलीला क्रूरपणे संपवले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी जेव्हा या प्रकरणाचा उलगडा केला तेव्हा सत्य ऐकून अधिकारीही थक्क झाले. राधिका असं या 15 वर्षीय मृत मुलीचं नाव आहे. जंगलात जळालेल्या अवस्थेतील तिचा मृतदेह सापडला होता. पंजाबच्या नवाशहर परिसरातील ही घटना आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 45 वर्षीय आई उषा राणी हिचे तिच्यापेक्षा निम्म्या वयाच्या गुरविंदर सिंग उर्फ गोपी (23) याच्याशी अनैतिक संबंध होते. या प्रेमसंबंधांमध्ये तिची 15 वर्षांची मुलगी अडथळा ठरत होती. याच रागातून आरोपी गुरविंदरने मुलीला घरात एकटे पाहिले आणि अत्यंत निर्घृणपणे तिचा गळा चिरून तिची निर्घृण हत्या केली. यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी त्याने मृतदेह एका सुटकेसमध्ये भरला आणि जंगलात नेऊन जाळला.

आरोपीला अटक

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी अत्यंत वेगाने तपासाची चक्रे फिरवली आणि आरोपी गुरविंदर याला तातडीने अटक केली. त्यानंतर त्याला न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, या धक्कादायक कटात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या आणखी कोणाचा सहभाग आहे का, याची कसून चौकशी या पोलीस कोठडीदरम्यान केली जात आहे.



जंगलात नेऊन जाळला मृतदेह

या भयंकर हत्येनंतर पुरावे नष्ट करण्यासाठी आरोपीने मृतदेहाचे तुकडे करण्याच्या हेतूने मुलीचा मृतदेह एका सुटकेसमध्ये कोंबला. ती सुटकेस आपल्या दुचाकीच्या मागे बांधून तो घनदाट जंगलात पोहोचला. जंगलात नेऊन आरोपीने सुटकेससह मृतदेहाला आग लावली. बेपत्ता झालेल्या मुलीचा तपास करत असताना पोलिसांना जंगलात राधिकाचा जळालेला सांगाडा सापडला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com